दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

वैभव विवेक स्वामी
सपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष – ५ वे अंक –३४८ | गुरूवार,दि.२१ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय –एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ । किंमत ३ रू | । पाने ४

Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-348 | Thursday, Dt.21 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# जिल्हा परिषदेच्या ११८३ महिला कर्मचाऱ्यांनी घेतला लाडकी बहीण योजनेचा लाभ

## कारवाई होणार, सीईओंचे आदेश



हिंगोली : राज्यातील लाडकी बहीण योजनेवरुन सातत्याने गदारोळ होताना पाहायला मिळतो. कारण, लाडकी बहीण योजनेतील लाभार्थी महिलांची स्क्रुटीनी होत असून दररोज नव्याने बोगस लाभ घेणारे लाभार्थी समोर येत आहेत. काही दिवसांपूर्वी राज्यातील तब्बल २६ लाख लाभार्थी महिलांची गृह चौकशी होणार असल्याचे वृत्त झळकले. त्यानंतर, विरोधकांनी सरकारवर जोरदार टीका केली होती, निवडणुकांपूर्वी सरसकट महिलांना लाभ देणारे सरकार आता महिलांची गळती करत असल्याचे विरोधकांनी म्हटले. त्यातच, आता आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून राज्यात ११८३ जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आलं आहे.

एका घरामध्ये दोन पेक्षा जास्त महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ घेता येत नाही. मात्र, दोन पेक्षा जास्त महिलांनी लाभ घेतलेल्या लाडक्या बहिणींची यादी सरकारने तयार केल्याचं समोर आलं होतं. त्यानुसार, तब्बल २६ लाख महिलांची यादी महिला व बालकल्याण विभागाने तयार केली आहे, या सर्व महिलांची विभागानुसार चौकशी करण्यास सुरुवात केली आहे. त्यातच आता जिल्हा परिषद कर्मचारी असलेल्या १ हजारपेक्षा जास्त महिलांनी देखील लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतल्याची बाब उघडकीस आली आहे.



### महिला कर्मचाऱ्यांवर कारवाईची टांगती तलवार

राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहीण योजनेत जिल्हा परिषदेच्या महिला कर्मचाऱ्यांनी लाभ घेतल्याची माहिती पुढे आली आहे. राज्यभरातील ११८३ कर्मचाऱ्यांनी या योजनेचा लाभ घेतल्याची माहिती महिला व बालविकास विभागाने सरकारला दिली. आता शासनाच्या कक्ष अधिकारी यांनी राज्यातील सर्व जिल्हा परिषदेच्या सीईओ यांना या बोगस लाडक्या बहिणींवर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा नियमांतर्गत कार्यवाही करण्यासाठी सर्व जिल्हा परिषदेच्या सीईओंना आदेश देण्यात आले आहेत. त्यामुळे, बोगस माहिती देत लाडकी बहीण योजनेचे दरमहा १५०० रुपये घेणाऱ्या जिल्हा परिषदेतील महिला कर्मचाऱ्यांवर आता कारवाईची टांगती तलवार आहे.

### लाखो महिलांना वगळणार

लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून राज्यात सध्या २ कोटी २९ लाख महिलांना लाभ मिळत आहे. मात्र, एकाच कुटुंबातील केवळ २ महिलांची छाननीचा निकष पूर्ण झाल्यानंतर आणखी लाखो महिला लाडकी बहीण योजनेतून वगळल्या जाणार आहेत. तर, जिल्हा परिषद कर्मचारी महिलांनाही आता योजनेतून वगळण्यात येईल. दरम्यान, योजनेच्या नियमानुसार मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थी महिलांना १५०० रुपये प्रतिमहिना दिले जातात. तर, ज्या महिला शेतकरी पीएम किसान सन्मान निधी योजना आणि नमो शेतकरी महासन्मान निधी योजनेता लाभ घेतात त्यांना मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ५०० रुपये दिले जातात.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या लंडनमधील घराला ना. पंकजाताई मुंडेंनी दिली भेट



## प्रेरणा अन् संघर्ष करण्याचे सामर्थ्य देणाऱ्या वास्तूचा माझ्यासह प्रत्येक भारतीयाला अभिमान

लंडन ।प्रतिनिधी

महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडन येथील निवासस्थानाला राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी आज भेट दिली. प्रेरणा आणि संघर्ष करण्याचे सामर्थ्य देणाऱ्या या वास्तूचा माझ्यासह प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे अशा शब्दांत त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

ना. पंकजाताई मुंडे सध्या लंडनमध्ये आहेत. आज त्यांनी भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या लंडनमधील घराला भेट देऊन डॉ आंबेडकर यांना अभिवादन केले. १९२१ ते २२ या कालखंडात डॉ. बाबासाहेबांचे या ठिकाणी वास्तव्य होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून महाराष्ट्र सरकारनं ही वास्तू काही वर्षापूर्वी खरेदी केली होती. ना. पंकजाताईंनी वास्तूमधील त्यांच्या आठवणी तसेच बाबासाहेबांचे फोटो, पुस्तके आदी बारकाईने न्याहाळले तसेच तिथल्या रजिस्टरवर अभिप्रायही नोंदवला.

प्रत्येक भारतीयाला अभिमान

(उर्वरीत पान २ वर)



रायमोहा – शिरूर तालुक्यातील ज्येष्ठ संपादक रामभाऊ काशीद यांचे प्रसिद्ध साप्ताहिक रायमोहा परिसर या वृत्तपत्राच्या कार्यालयाचे कार्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे प्रदेश संपर्कप्रमुख तथा दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांच्यासह जेष्ठ नेते वसंतराव सानप भाऊ, रायमोहाचे विद्यमान सरपंच सुभाष काका क्षीरसागर,कीर्तनकार हभप केशव महाराज राजगुरू, बाजार समितीचे संचालक भगवानराव सानप, हनुमंतराव सानप,प्राचार्य नामदेवराव सानप, भरतभाऊ जाधव,वैभव देवा कुलकर्णी माऊली सानप व सर्व गावकरी उपस्थित होते.

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!

प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन

दहिवाळ सुवर्णकार

नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777

शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

6x6.5



रायमोहा - येथील मतिमंद निवासी शाळा रायमोह येथे दैनिक समर्थ राजयोगचे संपादक वैभव स्वामी यांनी सदिच्छा भेट दिल्याने त्यांचे स्वागत करताना जेष्ठ नेते वसंतराव सानप भाऊ, रायमोचे विद्यमान सरपंच सुभाष काका क्षीरसागर, बाजार समितीचे संचालक भगवानराव सानप, हनुमंतराव सानप साहेब, प्राचार्य नामदेवराव सानप, भरत भाऊ जाधव, वैभव देवा कुलकर्णी, माऊली सानप व सर्व गावकरी उपस्थित होते.

## वाचकांना विनम्र आवाहन...

**दैनिक समर्थ राजयोगच्या ६ व्या वर्धापन दिनानिमित्त रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत...**

**दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक ६ सप्टेंबर २०२५ रोजी ६ वा वर्धापन दिन होत आहे.**

**या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.**

**आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया आपण तात्काळ**

**व्हाट्सअप नंबर ९८ २२ ६२ ८५ २१ यावर फोटोसह पाठवावी. ही विनम्र विनंती..**

आपलाच विश्वासू निमंत्रित

**वैभव जगदेवी विवेक स्वामी,**
संपादक
दैनिक समर्थ राजयोग, बीड.

## सस्नेह निमंत्रण..,
## दैनिक समर्थ राजयोगचा ६ वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५ रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा ६ वा वर्धापन दिन आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात...

स्थळ – हॉटेल नीलकमल, तहसीलच्या समोर,नगर रोड,बीड

दिनांक आणि वेळ,

शुक्रवार दिनांक ५ सप्टेंबर २०२५

वेळ – सायंकाळी ४ ते ७ पर्यंतच.

टीप – स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल श्रीफळ पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी त्याच रकमेचे शक्य असल्यास आपण सोबत येताना शैक्षणिक साहित्य आणावे...

आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल धन्यवाद...

आपलाच विश्वासू निमंत्रित

**वैभव जगदेवी विवेक स्वामी,**
संपादक
दैनिक समर्थ राजयोग, बीड.

## जाहिरातदारांना विनम्र आवाहन...

दै. समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

प्रति,
मा.श्री./सौ./श्रीमती ______

स.न.वि.वि.

मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन **शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी** साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठबळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

आपला विश्वासू
वैभव विवेक स्वामी (संपादक)
मो.9822628521

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम | |
|---|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- | ☐ |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- | ☐ |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- | ☐ |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- | ☐ |

कृपया आपण आपली व्यक्तिगत/संस्थेची जाहिरात वर दिलेल्या चौकोणात ✓ अशी मान्यता देऊन जाहिरात द्यावी ही नम्र विनंती.

प्रति,
मा.संपादक/व्यवस्थापक साहेब, दै.समर्थ राजयोग, बीड

महोदय,

वर्धापन दिन विशेषांक २०२५ करीता माझी वैयक्तिक/संस्थेची जाहिरात रु................../- पर्यंत प्रसिद्ध करावी. सदरील जाहिरात पोटी ॲडव्हान्स रु............../- रोख/चेक/डी.डी./ ऑनलाईन जमा करत आहे.

जाहिरातदाराचे नाव : ______

गाव : ______ तालुका : ______ जिल्हा : ______

मो.नं. : ______

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क :-
दै.समर्थ राजयोग कार्यालय
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी
गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
बँक खाते :
दै.समर्थ राजयोग
बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

## संपादकीय

# शोककथेची प्रस्तावना

गेल्या दोन दिवसांत मुंबईच्या जनजीवनाची जी त्रेधातिरपीट उडाली, त्यात खरंतर नवं काही नाही. दरवर्षी हे असंच होत असतं. नवीन आहे, ते पुणे आणि नव्याने वाढलेल्या अन्य शहरांच्या नागरी सुविधांचं झालेलं वस्त्रहरण. 'स्मार्ट सिटी' वगैरे सोडाच; पण पुण्यात पूर्वी जिथे पिण्याच्या पाण्याची मारामार होती, तिथे आता गुडघ्याच्या वर पाणी साचू लागलं आहे. एकेकाळच्या सायकलींच्या, त्यानंतर दुचाकींच्या या शहरातील रस्ते गाड्यांच्या वाहतुकीने तुंबू लागले आहेत. अन्य बाबतीत जाऊ द्या, पण नागरी असुविधा आणि शहर अनास्थेच्या बाबतीत पुण्याने मुंबईशी बरोबरी केली, हे मान्य करावंच लागेल! नाशिक, औरंगाबाद, नागपूर किंवा कोल्हापूरसारख्या अन्य शहरांत या दोन दिवसांत मुंबई - पुण्यासारखा पाऊस झाला नाही म्हणून. अन्यथा, या शहरांचे चेहरेही या दोन महानगरांपेक्षा वेगळे नसते! मराठवाडा आणि कोकणात पावसाने चांगलंच नुकसान केलं आहे. विशेषतः मराठवाड्यातल्या संत्र्या-मोसंबीच्या बागा आणि दोन्ही विभागातल्या शेतातल्या उभ्या पिकांची प्रचंड नासधूस झाली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलेल्या प्राथमिक अंदाजानुसार राज्यात सुमारे १२ ते १४ लाख हेक्टर जमिनीवर पिकांचं नुकसान झालं आहे. हे नुकसान प्रचंड आहे. श्रावणाच्या अखेरच्या पर्वात झालेल्या बेधुंद पावसाने हाता-तोंडाशी आलेली पिकं; काही ठिकाणी तर शेतजमीनही अक्षरशः वाहून नेली आहे. महानगरं आणि शहरात जनजीवन विस्कळीत झाल्याने होणारं नुकसान आणि ग्रामीण भागात शेतीमातीचं झालेलं नुकसान मोजलं, तर हा आकडा नक्कीच काही हजार कोटींत जाईल. जनजीवन विस्कळीत झाल्याने झालेल्या नुकसानीची भरपाई सरकारला करावी लागत नाही. पण, पिकांच्या नुकसानीची भरपाई सरकारला द्यावी लागते. पीक विमा योजनेतल्या अलीकडच्या बदलांमुळे मुळात शेतकऱ्यांचा या योजनेला असलेला प्रतिसाद अगदी अल्प राहिला आहे. त्यामुळे, या नुकसानीची जबाबदारी सरकारलाच घ्यावी लागेल. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या येत्या निवडणुकीचा विचार करून नुकसानीचे पंचनामे आणि भरपाई करायची झाली, तर तो आकडा मोठा असेल, यात शंका नाही.

महाराष्ट्रात नागरिकरण वेगाने होते आहे, हे जगजाहीर आहे. महाराष्ट्रातली स्थलांतरितांची संख्या वाढते आहे. गावातून निमशहरी भागात आणि शहरांत होणाऱ्या स्थलांतराचं प्रमाणही वाढतंच आहे. त्यामुळे, नागरी वस्तीसाठी अधिकाधिक जमीन वापरली जाते आहे. नागरी वस्ती म्हणजे केवळ घरं नव्हेत. घरांबरोबरच रस्ते, पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, वीजपुरवठा अशा अनेक सुविधा येतात. बदलत्या जीवनशैलीनुसार या व्यवस्था अद्ययावत असणं गरजेचं आहे. पण, दुर्दैवाने त्या तशा दिसत नाहीत. आधीच्या नसतील, तर त्यात तक्रार करण्यासारखं काही नाही. पण, ज्या नव्याने होत आहेत, त्याही येत्या ५० वर्षांच्या नियोजनाने आखल्या जात आहेत, असं दिसत नाही. त्यांच्या दर्जाचा प्रश्न तर आणखी वेगळा!

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई येथील श्री.आर.ए. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७०४/२०२५**
**प्रल्हाद पि. पंडीत मुगुटराव व ईतर विरूध्द निरंक**
**(मार्फत -ॲड. जी. एस. डोईफोडे,गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे विमल पंडीतराव मुगुटराव हे / हया दिनांक२९/१०/२०२० रोजी मौजे बागपिंपळगांव, ता. गेवराई, जि.बीड येथे झाले/झाल्या आहेत, अर्जदार क.१. प्रल्हाद पि. पंडीत मुगुटराव, वयः ३६ वर्षे, धंदाः शेती, राः बागपिंपळगांव, ता. गेवराई, जि. बीड, २. अल्का भ्र. ज्ञानेश्वर ऐडके, वय ३२ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. तळणेवाडी, ता. गेवराई, जि. बीड, ३. पंडीतराव पि. लिंबाजी मुगुटराव, वय ६५ वर्षे, धंदा शेती, रा. बागपिंपळगांव, ता. गेवराई, जि. बीड यांनी सदरहू मयताच्या नावे खालील प्रमाणे रक्कम जमा आहे.

| अ.क्र. | बँकेचे नाव / कंपनीचे नाव /पतसंस्थेचे नाव | क्रमांक बचत खाते क्र. | रूपये पै. |
|---|---|---|---|
| १ | भारतीय स्टेट बँक शाखा गेवराई ता.गेवराई जि.बीड | ६२४२६३४१३१२ | रु.२६,०८६.३३/- अक्षरी रूपये सव्वीस हजार श्याऐंशी रूपये व तेहतीस पैसे व व्याज |

वरील रक्कम मिळणेकामी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे विमल पंडीतराव मुगुटराव यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक १९/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २४/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६९७/२०२५**
**शिवाजी व इतर वि निरंक**
**(मार्फत ॲड. एस. डी. सानप, गेवराई)**

ज्याअर्थी मयत निलावती भ्र. सर्जेराव शिंद रा. रोहितळ ता. गेवराई जि. बीड हे दिनांक १२/०६/२०२५ रोजी रोहितळ ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क्र. १ शिवाजी पि. सर्जेराव शिंदे, वय २४ वर्षे, धंदा शेती, रा. रोहितळ ता. गेवराई जि. बीड अर्जदार क्र. २ जिजाबाई भ्र. लहु घोलप, वय- ३१ वर्षे, रा. तळेगाव ता. जि. बीड अर्जदार क. ३ छाया भ्र. अंगद लोणकर वय- २९ वर्षे, धंदा ता. जि. पुणे, अर्जदार क्र. ४ वैशाली पि. सर्जेराव शिंदे, वय २७ वर्षे, धंदा- शेती रा. घरकाम, रा. ओतुर रोहितळ ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत निलावती भ्र. सर्जेराव शिंदे रा. रोहितळ ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २६/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

## पान १ वरुन...

**भारतरत्न डॉ. बाबासाहेब ....**

प्रचंड प्रेरणा आणि संघर्ष करण्याचे सामर्थ्य देणारी ही वास्तू प्रत्येक भारतीयाला अभिमान वाटावी अशीच आहे असं सांगत आजची भेट म्हणजे केवळ एका वास्तूची पाहणी नव्हे तर समतेच्या, न्यायाच्या आणि शिक्षणाच्या मूल्यांना पुन्हा एकदा उजाळा देणारा अनुभव होती अशा भावना त्यांनी व्यक्त केल्या. डॉ.बाबासाहेबांचे कार्य हे केवळ भारतापुरते मर्यादित नसून जगभरातील शोषित, वंचित आणि प्रत्येकासाठी प्रेरणादायी आहे याची पुन्हा एकदा प्रचिती आली असं त्या म्हणाल्या. ना. पंकजाताई मुंडे यांच्यासमवेत सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ, आ.श्वेताताई महाले, भाजपचे पुणे जिल्हाध्यक्ष जगदीश मुळीक आदी उपस्थित होते.

**बीडमध्ये दोन दिवसीय ...**

मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच देश, विदेशातील संशोधक व विद्यार्थी उपस्थित राहणार आहेत. समारोप दुसऱ्या दिवशी २५ ऑगस्ट रोजी होईल. तत्पूर्वी, चर्चासत्रात सहभागी होण्यासाठी बीड शहरातील सौ.के.एस.के. महाविद्यालयात २० ऑगस्टपर्यंत नोंदणी करावी. तसेच, संपूर्ण शोधनिबंध सादरीकरणाची अंतिम तारीख २१ ऑगस्ट असणार आहे.

या परिषदेचे वैशिष्ठ,

या परिषदेचा मुख्य हेतू म्हणजे भारताच्या ऐतिहासिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय विकासामध्ये जनजाती समाजाचे योगदान अधोरेखित करणे, त्यांच्या समृद्ध परंपरेचा व शौर्याचा गौरव करणे व त्यांच्या वारशाचे पुनर्मूल्यांकन करणे होय. वसाहतवादी राजवटीविरुद्धच्या संघर्षांपासून ते अद्वितीय सांस्कृतिक वारशापर्यंत आदिवासी समाजाने भारतीय ओळख घडविण्यात दिलेले योगदान चर्चेत येणार आहे.

सहभाग व कार्यक्रमाची वैशिष्ट्ये

या चर्चासत्रात भारतासह विदेशातील नामांकित इतिहासकार, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, सामाजिक विचारवंत व संशोधक विद्यार्थी सहभागी होणार आहेत. एकूण १३ शैक्षणिक सत्रांमध्ये तज्ज्ञांचे व्याख्यान, संशोधनपत्रांचे सादरीकरण व चर्चा होईल. तसेच, बहुविद्याशाखीय चर्चासत्र, आदिवासी नायकांच्या नेतृत्वाखालील स्वातंत्र्यलढ्यावर विशेष भर, सांस्कृतिक कार्यक्रमांतर्गत आदिवासी कला, संगीत व परंपरेचे सादरीकरण, निवडक संशोधनपत्रांचे प्रकाशन होईल.

**एका दणक्यात जिल्हा ...**

मंडळाला त्या बँकेच्या आवारात गेल्या दीड वर्षापासून बेकायदेशीर रीतीने मुक्काम ठोकणाऱ्या तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड यांना रोखता आले नाही, ही बाब योग्य नाही. दरम्यान, यात ॲड. देशमुख यांनी सहकार आयुक्त कार्यालय पुणे, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था लातूर यांनीही लक्ष घातले आहे. एकीकडे दीड वर्षापासून शासनाकडून घर भाडे भत्ता घेणे आणि फुकट रहाणे, याचीही आता चौकशी होईल, असे ॲड. देशमुख यांनी म्हटले आहे.

**जमियत ए उलेमा हिंद....**

हाफिज आलम खान, उपाध्यक्ष वसीम तांबोळी, उपाध्यक्ष परवेज, सचिव सय्यद सईद, मौलाना निसार, सहसचिव हाफिज मुजम्मिल, खजिनदार मौलाना जुबेर, शहराध्यक्ष मौलाना युसूफ, उपाध्यक्ष तारेख चाऊस, उपाध्यक्ष हाफिज आबिद, सचिव हाफिज नेहाल, सहसचिव अफरोज पठाण, सहसचिव शाहरुख डावरगांवकर, खजिनदार मौलाना मुनाफ कार्याकारणी घोषित करण्यात आले आहे.तसेच सर्वांना संघटनेच्या सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक कार्यात अधिक सक्रिय भुमिका घेण्याचे आवाहनही वरिष्ठांनी नव्या कार्यकारिणीला केले.जमियत ए उलेमा हिंद ही केवळ एक धार्मिक संघटना नसून ती राष्ट्रीय एकात्मता, सामाजिक सलोखा आणि धर्मनिरपेक्षतेचे प्रतीक आहे.या क्रार्यक्रमात उपस्थितांनी देशाच्या एकतेसाठी, शांततेसाठी आणि विकासासाठी कार्यरत राहण्याचा संकल्प केला.यावेळी शहरातील व ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सुशील सांगवीकर यांची केसके महाविद्यालयात कनिष्ठ प्राध्यापक म्हणून निवड

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टल मधून टीईटी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने सुशील कुमार त्रिंबक सांगवीकर यांची सौ केएसके महाविद्यालय बीड येथे कनिष्ठ प्राध्यापक म्हणून निवड करण्यात आली आहे. या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.



सुशील कुमार सांगवीकर यांचे प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण शिवाजी विद्यालयात झाले. उच्च माध्यमिक शिक्षण ज्या सौ केएसके कॉलेजमध्ये घेतले त्याच कॉलेजमध्ये त्यांचे वडील देखील ज्युनियर प्राध्यापक होते. वडिलांच्या सेवानिवृत्तीनंतर ज्या कॉलेजमध्ये शिक्षण घेतलं त्याच कॉलेजमध्ये ज्युनियर प्राध्यापक होण्याचे भाग्य सुशीलकुमार त्रिंबक सांगवीकर यांना लाभलं आहे. त्यामुळे त्यांचे विशेष कौतुक होत असून सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. त्यांना पुढील कार्यासाठी दैनिक समर्थ राजयोग परिवाराच्या वतीने अभिनंदन.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६८४/२०२५**
**कांताबाई प्रभाकर काळे विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड. ए एम सुतार)**

ज्याअर्थी मयत नामे प्रभाकर निवृत्ती काळे हे दिनांक २८.०२.२०२५ रोजी लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार

१. कांताबाई प्रभाकर काळे वय ५८ वर्षे धंदा घरकाम
रा. लुखामसला ता. गेवराई जि. बीड
२. जगदीश प्रभाकर काळे वय ३६ वर्षे धंदा-शेती रा. सदर
३.अनंता प्रभाकर काळे वय ३५ वर्षे धंदा शेती रा. सदर
४. अश्विनी गजानन नागवे वय ३८ वर्षे धंदा घरकाम
रा. बदनापुर, ता. बदनापुर, जि. जालना

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे प्रभाकर निवृत्ती काळे रा. लुखामसला, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ०७.१०.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई, ता. गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज क.५६७/२०२५**
**कांताबाई साहेबराव हातागळे वगैरे ६ वि. निरंक**
**(मार्फत-ॲड. ए. एम. सुतार गेवराई)**

ज्याअर्थी मयत साहेबराव गिरमाजी हातागळे तसेच शिवाजी साहेबराव हातागळे, दोघेही रा. साठेनगर गेवराई, ता. गेवराई, जि. बीड हे अनुक्रमे दिनांक ०३/०५/२०१३ व १४/०९/२००३ रोजी साठे नगर गेवराई, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार :- १ कांताबाई साहेबराव हातागळे, वय ७५, रा. साठेनगर गेवराई, ता.गेवराई, जि.बीड.
२ महादेव साहेबराव हातागळे, वय ४४, रा. साठेनगर गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.
३ प्रकाश साहेबराव हातागळे, वय ४७, रा. साठेनगर गेवराई, ता.गेवराई, जि. बीड.
४ मंगल हिरामन आडागळे, वय ५८, रा. अचानक नगर गेवराई, ता. गेवराई, जि.बीड.
५.लक्ष्मी विश्वनाथ पिंगळे, वय ४८, रा. अचानक नगर गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.
६ जयश्री शिवाजी हातागळे, वय ४२, रा. अचानक नगर गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.
७.विशाल शिवाजी हातागळे, वय २०, रा. अचानक नगर गेवराई, ता. गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार क्र.१ ते ७ यांना सदर मयत साहेबराव गिरमाजी हातागळे तसेच शिवाजी साहेबराव हातागळे, यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनाक ०४/०७/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख ०६/१०/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# आपण दोघे भाऊ भाऊ आणि शंभर कोटी वाटून खाऊ

## क्षीरसागर बंधूंवर भाजप नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांचा गंभीर आरोप

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य सरकारचे मुख्यमंत्री देवाभाऊ फडणवीस साहेब आणि शिवसेना चे नेते उपमुख्यमंत्री एकनाथ भाऊ शिंदे साहेब अजित दादा पवार साहेब असताना तसेच महाराष्ट्राच्या रणरागिणी संघर्ष कन्या भारतीय जनता पार्टीच्या आमच्या नेत्या आदरणीय पंकजाताई मुंडे या असताना शंभर कोटी बीड शहराला देण्याच्या फंडाची घोषणा दादांनी केली आहे. याचे आम्ही स्वागत करत आहोत. परंतु या शंभर कोटी रुपये वाटून खाण्याच्या स्पर्धा दोन क्षीरसागर बंधूमध्ये लागल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे हे दुर्दैव आहे असे भाजपा नेते नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी म्हटले आहे.



बीड शहरांमध्ये विकासासाठी आत्ताच नुकताच बीड जिल्ह्याचे पालकमंत्री तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा यांनी शंभर कोटी देण्याची घोषणा केली. परंतु ती घोषणा कितपत खरी आहे याच्यावर देखील शंका कु शंका नागरिकांमधून व्यक्त होत आहेत. परंतु याच पार्श्वभूमीवर या बीड शहरातील प्रस्थापित असणारे क्षीरसागर कुटुंब गेल्या पंचवीस तीस वर्षापासून नगरपालिकेवर सत्ता गाजवणारे यांचे चुलते बीड जिल्ह्याचे माजी पालक मंत्री होते. महाराष्ट्राचे कॅबिनेट मंत्री होते हे सगळं असताना देखील त्यांना बीड जिल्ह्याचा विकास करता आला नाही. यांचे चुलते बीड नगरपालिकेचे नगराध्यक्ष भारत भूषण क्षीरसागर म्हणून बीड शहरांमध्ये कार्यरत होते. परंतु बीड शहराचा कुठलाच विकास झालेला नसून सगळा भकास झालेला दिसत आहे. शहरांमध्ये कुठेच चांगले रस्ते नाहीत .सगळीकडे खड्ड्याचे वातावरण ,घाणीचे साम्राज्य, मोकाट जनावरांचा बंदोबस्त नाही. पिण्याच्या पाण्याचे नियोजन नाही रस्त्यात खड्डा का खड्ड्यात रस्ता हेच बीडकरांना कळेना असे झाले आहे आणि पाण्याच्या बाबतीत देखील तीन तेरा वाजलेले आहेत. २५ दिवसाला पाणी बीड शहराला येते, एवढा मोठा डॅम जवळ असताना देखील हे बीड शहराचं बीड शहराला पाणीपुरवठा करणारे बिंदूसरा धरण देखील वरून होऊ लागलेला आहे तरीसुद्धा बीड शहराला पाणी येत नाही हे दुर्दैव आहे. बिडकर यांचे आहे असेच म्हणावा लागेल आणि आता नगरपालिकेच्या निवडणुका जवळ आल्या की या दोन भावांना वेगवेगळे वेद लागलेले आहेत आता पालकमंत्री अजित दादा पवार यांनी शंभर कोटी रुपये देण्याची घोषणा मुक्ती जाहीर केली त्याच श्रेय घेण्यासाठी या दोन बंधूमध्ये स्पर्धा लागल्या आहेत एक म्हणतो मी आणले एक म्हणतो मी आणले म्हणून अशी चर्चा सध्या चालले आहे की, आपण दोघे भाऊ भाऊ आणि शंभर कोटी वाटून खाऊ आणि बीड शहराचा भकास करू असे चित्र सध्या दिसत असल्याचे पाहायला मिळत आहे तमाम बीड शहरातील नागरिकांनी यांच्या भुलथापांना बळी पडू नये येणाऱ्या काळामध्ये त्यांना जनता त्यांची जागा दाखवून देईल. उद्याच्या नगरपालिका निवडणुकीमध्ये यांना जनता त्यांची जागा दाखवल्याशिवा स्वस्त बसणार नाही. असा गंभीर आरोप आरोप करून इशारा भारतीय जनता पार्टीचे नेते तथा बीड नगर परिषदेचे माजी सभापती नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी प्रसिद्धी माध्यमाच्या माध्यमातून दिला आहे.

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६४३ / २०२५**
**संगीता राजेंद्र जावळे व इतर वि निरंक**
**(मार्फत - ॲड. पी. एम. वाघमारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत राजेंद्र पि. सुर्यकांतराव जावळे रा. राम मंदीर गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड हे दिनांक ०५/०१/२०२५ रोजी राम मंदीर गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत.

अर्जदार क. १ संगीता भ्र. राजेंद्र जावळे, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. रंगार चौक, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. २ सौरभ पि. राजेंद्र जावळे, वय २७ वर्षे, धंदा शेती, रा. राम मंदीर गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क्र. ३ रेवती पि. राजेंद्र जावळे, वय २१ वर्षे, धंदा - शेती, रा. राम मंदीर गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत राजेंद्र पि. सुर्यकांतराव जावळे रा. राम मंदीर गल्ली, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ३१/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख -१०/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६०४/२०२५**
**पार्वती तुकाराम खरात व इतर वि निरंक**
**(मार्फत ॲड. डोईफोडे जी. एस., गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे तुकाराम पि. विठ्ठलराव खरात रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड हे / हया दिनांक २९/११/२०२३ रोजी भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार क. १ पार्वती भ्र. तुकाराम खरात, वय ८० वर्षे, धंदा सुखवस्तु, रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. २ आण्णासाहेब पि. तुकाराम खरात, वय ५८ वर्षे, धंदा शेती, रा. पाथरवाला (बु.), ता.अंबड जि. जालना, अर्जदार क्र. ३ भाऊसाहेब पि. तुकाराम खरात, वय -५३ वर्षे, धंदा-शेती, रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ४ अविनाश पि. तुकाराम खरात, वय ४९ वर्षे, धंदा शेती, रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड, अर्जदार क. ५ सुनिता भ्र. वसंत देशमुख, वय ५६ वर्षे, धंदा - शेती, रा. पाथरवाला (बु.), ता. अंबड जि. जालना यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत तुकाराम पि. विठ्ठलराव खरात रा. भगवान नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १५/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २६/०८/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्रीमती. एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांकः ६८१ / २०२५**
**कांताबाई बबन वीर विरूध्द निरंक**
**(मार्फत ॲड.जोशी आर ए)**

ज्याअर्थी मयत नामे बबन आनंदा वीर हे दिनांक ३०.०८.२०२३ रोजी उमापुर, ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार

१.कांताबाई बबन वीर वय ६० वर्षे धंदा- घरकाम
रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
२. विठ्ठल बबन वीर वय ३२ वर्षे धंदा - शेती
रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड
३.छायाबाई अशोक घोडके वय ३८ वर्षे धंदा-घरकाम
रा. मधीली गल्ली, लाडजळगाव, ता. शेवगाव जि. अहिल्यानगर
४.मुक्ता पप्पू सामसे वय ३४ वर्षे धंदा घरकाम
रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड

शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घ घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे बबन आनंदा वीर रा. उमापुर ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख : ३०.०९.२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री.आर.ए.मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६९८/२०२५**
**सुनिता राजेश बडे विरूध्द निरंक**
**(मार्फत-ॲड. एस. बी. नाकाडे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे राजेश पि. श्रीधर बडे हे/हया दिनांक. ०७/०७/२०२५ रोजी संगमजळगांव ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत.

अर्जदार क.१ सुनिता भ्र. राजेश बडे, वयः ५१ वर्षे, धंदाः शेती व घरकाम, राः संगमजवळगांव, ता. गेवराई जि.बीड, २. वैभव पि. राजेश बडे, वयः २९ वर्षे, धंदाः शिक्षण, राः संगमजळगांव, ता. गेवराई जि.बीड ३. अक्षय पि. राजेश बडे, वयः २५ वर्षे, धंदाः खाजगी नोकरी, राः संगमजळगांव, ता. गेवराई जि.बीड ४. प्रयागाबाई भ्र. श्रीधर बडे, वय ७५ वर्षे, धंदा शेती व घरकाम, रा. वारणी, ता. शिरूर का. जि. बीड, ५. श्रीधर पि. देवराव बडे, वय ८५ वर्षे, धंदा शेती रा. वारणी, ता. शिरूर का. जि. बीड यानी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे राजेश पि. श्रीधर बडे यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २४/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ७०१ / २०२५**
**सुनिता सुनिल कुलकर्णी विरूध्द निरंक**
**(मार्फत-ॲड. आर. एल. गवारे, गेवराई)**

ज्याअर्थी मयत नामे सुनिल प्रभाकर कुलकर्णी हे/ हया दिनांक. २१/२/२०१३ रोजी धोंडराई ता. गेवराई जि.बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क.१. सुनिता भ्र. सुनिल कुलकर्णी, वयः ४५ वर्षे, धंदाः घरकाम, राःधोंडराई ता. गेवराई जि.बीड २. शुभम पि.सुनिल कुलकर्णी,वयः २४वर्षे, धंदाःशिक्षण राः धोंडराई ता. गेवराई जि.बीड ३. सुशिला भ्र. प्रभाकर कुलकर्णी, वयः ८० वर्षे, धंदा घरकाम राःधोंडराई ता. गेवराई जि.बीडयानी शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार व गैरअर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार व गैरअर्जदार यांना सदर मयत नामे सुनिल प्रभाकर कुलकर्णी यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १८/८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २४/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

### वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील २ रे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**
**श्री. एच. एम. मोमीन यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६७९/२०२५**
**प्रदिप व इतर वि निरंक**
**(मार्फत - ॲड. एस. एल. कदम, गेवराई)**

ज्याअर्थी मयत सर्जेराव पि. सुंदरराव शेंडगे रा. राहेरी ता. गेवराई जि. बीड हे दिनांक २२/११/२०२४ रोजी हेडगेवार हॉस्पीटल, छत्रपती संभाजीनगर ता. छत्रपती संभाजीनगर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झाले/ झाल्या आहेत.

अर्जदार क्र. १ प्रदिप पि. सर्जेराव शेंडगे, वय - २२ वर्षे, धंदा मजुरी, रा. राहेरी ता. गेवराई जि. बीड अर्जदार क्र. २ महेश पि. सर्जेराव शेंडगे वय- २४ वर्षे, धंदा- शेती रा. राहेरी ता. गेवराई जि. बीड अर्जदार क. ३ सुबद्राबाई भ्र. सर्जेराव शेंडगे, वय - ७२ वर्षे, धंदा मजुरी रा. राहेरी ता. गेवराई जि. बीड यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत सर्जेराव पि. सुंदरराव शेंडगे रा. राहेरी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १४/०८/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २४/०९/२०२५

स्वाक्षरित/-
**कनिष्ठ लिपीक**
दिवाणी न्यायालय,
क.स्तर,गेवराई

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित/-
**सहाय्यक अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई

# बीड मध्ये मोटार सायकल चोरणारी टोळी पकडली

## स्थानिक गुन्हे शाखेने ७ मोटारसायकली हस्तगत करून बेड्या ठोकल्या

बीड ।प्रतिनिधी

स्थानिक गुन्हे शाखेने ७ मोटार सायकली किं. ४,४०,०००/- रुपयाचे जप्त करुन सदरील मोटार सायकल व दोन आरोपी निलेश विष्णु गायकवाड, वय ३३ वर्ष, रा. सुभाष कॉलनी पेठ बीड आणि शिवाजी यलप्पा जाधव, वय ३४ वर्ष, रा डोमरी ता. पाटोदा जि बीड यांना पोलीस ठाणे बीड शहर यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आले आहे.

मा. पोलीस अधीक्षक बीड यांनी बीड जिल्हयामध्ये मोटार सायकल चोरणाऱ्या ईसमांची माहीती काढून कारवाई करण्याचे आदेशित केल्याने स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने त्या दृष्टीने प्रयत्न सुरु केले होते. आज दिनांक २०.०८.२०२५ रोजी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत माहीती मिळाली की, बीड मध्ये विवीध ठिकाणाहून चोरी गेलेल्या मोटार सायकली हया निलेश विष्णु गायकवाड याने चोरल्या असुन तो सध्या त्याचे राहते घरासमोर उभा आहे. अशी माहीती मिळाल्यावरुन ताबडतोब पथकाने सदरील ठिकाणी जावुन त्यास ताब्यात घेवुन चोरी केलेल्या मोटार सायकली कोठे आहेत या बाबत विचारपुस केली असता त्याने सदरील मोटार सायकली त्याचा साथीदार शिवाजी यलप्पा जाधव याचे कडे विक्री साठी ठेवल्या आहेत असे सांगीतले. त्यावरुन शिवाजी जाधव याचे कडुन एकुण ०७ मोटार सायकल मिळुन आल्या. त्याचे कडुन मिळुन आलेल्या मोटारसायकल वरुन खालीलप्रमाणे मोटार सायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आले आहेत.



१. पोलीस ठाणे बीड शहर गु.र. नं १०९/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस

२. पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं २५६/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस

३. पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं ३०३/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस

४. पोलीस ठाणे बीड शहर गु.र.नं ५९/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस

५. पोलीस ठाणे पेठ बीड गु.र.नं १९०/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस

६. पोलीस ठाणे पेठ बीड गु.र.नं २९९/२०२४ कलम ३०३ (२) बी.एन.एस

७. पोलीस ठाणे शिवाजीनगर गु.र.नं ४०३/२०२५ कलम ३०३ (२) बी.एन.एस

अश्या एकुण ०७ मोटार सायकली किं. ४,४०,०००/- रुपयाचे जप्त करुन सदरील मोटार सायकल व दोन आरोपी निलेश विष्णु गायकवाड, वय ३३ वर्ष, रा. सुभाष कॉलणी पेठ बीड आणि शिवाजी यलप्पा जाधव, वय ३४ वर्ष, रा डोमरी ता. पाटोदा जि बीड यांना पोलीस ठाणे बीड शहर यांचे ताब्यात पुढील तपासकामी देण्यात आल्या आहेत.

सदरील कामगिरी श्री नवनित काँवत, पोलीस अधीक्षक, बीड, श्री सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री शिवाजी बंटेवाड, स्थानिक गुन्हे शाखा, बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक श्रीराम खटावकर, पोलीस हवालदार, आनंद म्हस्के, विकास राठोड, सोमनाथ गायकवाड, राहुल शिंदे, बाळु सानप, अर्जुन यादव, आशपाक सय्यद, मनोज परजणे, विकी सुरवसे,

---



अहमदपुर - वसुंधरा रत्न राष्ट्रसंत सद्गुरू प.पू डॉ शिवलिंग शिवाचार्य महाराज अहमदपूरकर यांच्या संजीवन समाधी स्थळी महाआरती करून श्रीक्षेत्र भक्ती स्थळ येथील श्रावण महिन्यातील शिवनाम सप्ताह ची सांगता संपन्न झाली. याप्रसंगी सचिन भाऊ शहागडकर यांनी गुरूंचा सत्कार घेतला. तेथील शिवभक्त व कमिटीच्या वतीने वर्षभर भक्ती स्थळ येथे हरिनाम गजर व अन्नदानाचे नियमित कार्य केले जाते. असे कमिटीचे सदस्य हवगीआप्पा देवने यांनी सांगितले.

---



## चितावनीखोर स्टेटसवरुन झाला दोन गटात वाद, आई वडिलांचे स्टेटस ठेवा साहेबांनी दिली साद

वैराग ।प्रतिनिधी

धामणगाव दु ता बार्शी येथील दोन गटांनी एकमेकांना खुन्नस देण्यासाठी वॉटसपला स्टेटस ठेवले. दोन्ही गटाच्या कार्यकर्त्यांनी लग्न समारंभात नाचण्याच्या कारणावरुन धक्काबुक्की केली. याचे रुपांतर मोठ्या वादात होऊन कायदासुव्यवस्था बिघडू नये यासाठी वैराग ता बार्शी येथील पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक कुंदन गावडे यांनी पुढाकार घेतला. वादात आघाडीला असलेल्या दोन्ही बाजूंच्या युवकांना पोलिस स्टेशनमध्ये बोलावून घेतले आणि त्यांच्याशी संवाद साधत मतपरिवर्तन केले.

स्थानिक गाव पुढाऱ्यांचे फोटो स्टेटसला ठेवून एकमेकांवर कुरघोडी करण्यापेक्षा आपल्यासाठी काबाडकष्ट करणार्या आई वडिलांचे फोटो ठेवून त्यांचा सन्मान करा असे आवाहन केले.यावेळी गावडे यांनी वादविवाद,व्यसनाधिनता टाळून जातीय सलोखा आणि गावात एकोपा ठेवा. तसेच अभ्यास करुन रोजगार प्राप्ती करा असे आवाहन केले. यावेळी पो उपनिरीक्षक प्रतापसिंह जाधव, राजेंद्र भापकर शिवाजी हाळे, शिवलिंग कांबळे अमोल भोरे,किसन कोलते,पोलिस पाटील गणेश मसाळ उपस्थित होते.

---



# मंठा येथे मराठा समाजाची बैठक संपन्न

## मुंबईकडे जाण्याचा निर्धार, जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला समर्थन

तळणी ।प्रतिनिधी

मराठा समाजाला आरक्षण मिळावे या मागणीसाठी लढा देणारे मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी दि. २९ ऑगस्ट रोजी मुंबईत आमरण उपोषणास सुरुवात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या या आंदोलनाला भक्कम पाठिंबा देण्यासाठी मंठा तालुक्यातील मराठा बांधव मोठ्या संख्येने मुंबई गाठणार असल्याचा ठाम निर्धार बुधवारी ता.२० रोजी सरस्वती मंगल कार्यालयात झालेल्या बैठकीत व्यक्त करण्यात आला.जरांगे पाटील हे दि. २७ ऑगस्ट रोजी अंतरवली येथून प्रस्थान करणार असून, दि. २८ ऑगस्ट रोजी शिवनेरी किल्ल्याचे दर्शन घेऊन ते मुंबईकडे मार्गस्थ होणार आहेत. प्रवासादरम्यान मराठा समाजाच्या न्यायासाठीचा निश्चय दृढ करण्याचे आवाहन ते समाजबांधवांना करणार आहेत.

गेल्या वर्षभरापासून मराठा समाजाला सरसकट कुणबी प्रमाणपत्र देऊन ओबीसी आरक्षणात समाविष्ट करण्याची मागणी जरांगे पाटील सातत्याने करत आहेत. वाशी येथे सगे-सोयरे अध्यादेश काढण्याचे आश्वासन सरकारने दिले होते; मात्र शासनाने अद्याप तो शब्द पाळला नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त करत मुंबई उपोषणाचा मार्ग स्वीकारला आहे. या बैठकीत श्री. किशोर आबा मरकड, गणेश दादा शिदे, बळीराम मोरे, नंदू दाभाडे, संभाजी देशमुख, नानासाहेब खंदारे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी एक मराठा लाख मराठा, आता कुठे जायचंय? मुंबईला जायचंय!, जय जिजाऊ, जय शिवराय! अशा घोषणांनी वातावरण दणाणून गेले.

---

# नुकसानग्रस्त भागाचे पंचनामे करून शेतकऱ्यांना तात्काळ मदत करा - डॉ ज्योती मेटे

बीड ।प्रतिनिधी

आमागील तीन दिवसापासुन जिल्ह्यात सतत पर्जन्यवृष्टी होत आसुन हजारो हेक्टर पीक क्षेत्र बाधीत झाले आहे. शासनाने घरांचे नुकसान, जिवीत हानी, पशुधन व शेतीचे नुकसान भरपाईचे अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिले असल्याने आपण महसुल यंत्रणेकडून अतिशीघ्र महसुल मंडळनिहाय पाहणी करून नुकसान भरपाई देण्याबाबत कार्यवाही करावी अशी मागणी शिवसंग्राम अध्यक्ष डॉ. ज्योतीताई विनायकराव मेटे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कडे केली आहे.जिल्ह्यात पावसामुळे हजारो हेक्टरवरील शेती पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांची सरकारने दखल घेतली आहे. त्यानुसार नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना लवकरच सरकार मदत देणार असल्याची घोषणा केली आहे. यासाठी जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना नुकसानाचे पंचनामे करून तात्काळ अहवाल देण्यास सांगितले आहे. त्यामुळे जिल्हाधिकारी आणि प्रशासनाने जिल्ह्यातील नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून त्याचा अहवाल तातडीने सादर करावा अशी मागणी यावेळी डॉ. ज्योती मेटे यांनी केली आहे याप्रसंगी शिवसंग्राम जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे, तालुकाध्यक्ष पंडितराव माने, किसान आघाडीचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सामाजिक न्याय विभागाचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, मनोज जाधव,शेख आबेद, ज्ञानेश्वर कोकाटे, दादा गोंदावले, प्रा.पंडित शेंडगे, मंगेश माने आदी सह शेतकरी व शिवसंग्रामचे पदाधिकारी,



---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२६६ दि.१८.०८.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती तमीजोद्दीन नजमोद्दीन शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | वसीम तमीजोद्दीन शेख | मुलगा | १४.०४.१९८५ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२६८ दि.१८.०८.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती तमीजोद्दीन नजमोद्दीन शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | रिजवाना बानो शेख तमीजोद्दीन | मुलगी | ०१.०६.१९७९ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-३०४ दि.१८.०८.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती विलसन एकनाथ घुले, रा.नांदी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **नाती**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सृष्टी राजु कसबे | नात | ०५.०९.२०२२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२६७ दि.१४.०८.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती तमीजोद्दीन नजमोद्दीन शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शबाना बानो शेख तमीजोद्दीन | मुलगी | ०२.०६.१९८१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२७४ दि.१८.०८.२०२५**

**जाहिर प्रगटन**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान/श्रीमती तमीजोद्दीन नजमोद्दीन शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | तसलीन बानो शेख तमीजोद्दीन | मुलगी | ०२.१०.१९८२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १८/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# धर्मापुरीच्या ऐतिहासिक प्राचीन वास्तू व शिल्पकलाकृतीच्या जीर्णोद्धारासाठी मी कटिबद्ध -ॲड.गोविंदरावजी फड

अंबाजोगाई / सुनिल सिरसाट

परळी तालुक्यातील धर्मापुरी हे मोठ्या बाजारपेठेचे गाव. जवळपास या गावाहून भोवतालच्या ४० खेड्यांचा कारभार चालतो. परळी तालुक्यातील सर्वात मोठी सोसायटी व ग्रामपंचायत असलेल्या धर्मापुरी गावाला तसा मोठा ईतिहास ही आहे. नुकतीच काल परवा राज्य दैनिकात मल्लिकार्जुन मंदिरातील दगडी खांबांना तडे, सुरक्षा धोक्यात....! अशी बातमी येऊन गेली. त्या अनुषंगाने धर्मापुरीचे सरपंच तथा माजी सभापती ड. गोविंदराव फड यांच्याशी वार्तालाप केला असता त्यांनी सांगितले की, धर्मापुरीला प्राचीन वास्तू व शिल्पकलाकृतीचा ऐतिहासिक ठेवा असून तो जपण्यासाठी व त्याच्या जिर्णोद्धारासाठी गावचा सरपंच म्हणून मी कटीबद्ध आहे.

धर्मापुरी हे गाव जवळपास पंधरा हजार लोकसंख्येचे गाव असून दहा हजार मतदार असणारी ही १७ ग्रामपंचायत सदस्यांची मोठी ग्रामपंचायत आहे या ग्रामपंचायतीचे दुसऱ्यांदा अगदी बहुमताने सरपंच असणारे ड. फड हे अगदी उच्चशिक्षित असून ते परळी कृ.उ.बा.स. आणि पं.स.चे सभापतीही राहिलेले आहेत. शिवाय ते परळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष राहिलेले आहेत. पुणे येथील आंतरराष्ट्रीय दर्जा असलेल्या सिम्बॉयसिस विधी महाविद्यालयातून वकिलीची पदवी प्राप्त केलेल्या गोविंदराव फड यांना वकिलीत फारसा रस नव्हता. शालेय-महाविद्यालय जीवनापासूनच वडिलांचा छोटा-मोठा राजकीय वारसा असलेल्या फड यांनी वकिलीपेक्षा राजकारणात जाऊन गावाचा आणि आपल्या गावावर अवलंबून असणाऱ्या भोवतालच्या बहुतांशी खेड्यांचा विकास करता यावा म्हणून स्व. लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे यांचे नेतृत्व स्वीकारत राजकारणात प्रवेश केला. परंतु अल्पावधीतच ज्यांच्यामुळे फड यांनी भारतीय जनता पार्टीचे कास धरली होती त्या स्व.मुंडे साहेबांना सोडून त्यांचे पुतणे आ.धनंजय मुंडेसोबत मुंडे साहेबांपासून बाजूला होत माझे नेते फक्त धनंजय मुंडे आहेत असे जाहीरपणे सांगून त्यांचे नेतृत्व स्वीकारले. भाजपात असताना परळी पं.स.चे तर धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली पुन्हा एकदा आपल्या कार्यशैलीच्या आणि विश्वासाहर्तेच्या जोरावर परळी कृ.उ.बा.स.चे सभापती पद भुषविले. दोन वेळा सभापती पदी आपली वर्णी लावून घेत तालुक्याच्या विकासासोबत कटिबद्ध राहत असताना माझ्या स्वतःच्या गावाकडे काहींशी दुर्लक्ष तर होत नाहीये ना....! या खंतिय भावनेने ड.फड यांनी तत्कालीन विरोधी पक्षनेते धनंजय मुंडे यांना एकांतात आपल्या मनातील खदखद स्पष्टपणे बोलून दाखवल्याने नेत्याने वकील साहेब आता तुम्ही ग्रामपंचायतीकडे लक्ष द्या असा आदेश दिल्याने नुकतीच तोंडावर असलेली ग्रामपंचायत निवडणूक लढवण्याचा फड यांनी निर्धार केला. निवडणूक लढली आणि पहिल्याच निवडणुकीत १७ सदस्यांच्या ग्रामपंचायतीत १३ विरुद्ध ४ या समीकरणात स्वतःचे १३ सदस्य मोठ्या फरकाने निवडून आणले आणि जनतेच्या व सदस्यांच्या आग्रहास्तव गोविंद फड स्वतः सरपंच झाले.

शासन-प्रशासनाचा दांडगा अनुभव असलेल्या फड यांनी धर्मापुरी गावचा सरपंच झाल्यानंतर तत्पूर्वी कधीच नव्हे इतक्या मोठ्या प्रमाणात मंत्री व पालकमंत्री झालेल्या ना.धनंजय मुंडे यांच्या माध्यमातून करोडो रुपयांचा विकास निधी आणत धर्मापुरी येथील १८ पगड जाती-धर्माच्या सर्व समाजवासीयांना आवश्यक असणाऱ्या सर्व सोयीसुविधा देत शाळा, रुग्णालय, ३३ के.व्ही.वीज उपकेंद्र, दोन पाझर तलाव,



गावातील संपूर्ण रस्ते, पाणीपुरवठा योजना यांसह ईतर सर्व भौतिक सुविधा पहिल्या टप्प्यात गावाला देऊन गावाने केलेली निवड सार्थ ठरवत फड हे त्यांचे नेते धनंजय मुंडे यांच्यासह धर्मापुरी भोवतालच्या ४० खेड्यांसह संपूर्ण परळी तालुक्यात एक विकासाभिमुख नेतृत्व म्हणून लोकप्रिय ठरत गेले. बघता बघता पहिली पंचवार्षिक संपली आणि परत ग्रामपंचायतीची निवडणूक आली. यावेळी सरपंच सदस्यांऐवजी जनतेतून निवडला जाणार होता. आता इतर कोणाला तरी संधी देऊ म्हणणाऱ्या सरपंच फड यांचे गावकऱ्यांनी आणि नेत्याने ऐकले नाही. आता गावाचा प्राचीन, पुरातत्त्व ऐतिहासिक ठेवा जतन करण्यासाठी आणि त्याचा विकास करण्याचे शिल्लक राहिल्याने याही वेळी आपणच सरपंच व्हावे लागते. या सर्वांच्या आग्रहापोटी पुन्हा एकदा सरपंच पदाची निवडणूक लढवली. यावेळी मात्र मंत्री धनंजयजी मुंडे, स्वतः ड.गोविंद फड यांच्यासह परळी तालुक्यातील कुणीही विचार केला नसेल असा अनपेक्षित निकाल गावकऱ्यांनी दिला. तब्बल १७ पैकी १७ सीट निवडून देऊन विरोधकांचा सुफडासाफ करत गावाने गोविंद फड या नेत्यावरचा विश्वास संपूर्ण बीड जिल्ह्याला दाखवून दिला.गावाच्या, सहका-यांच्या आणि आपल्या नेत्याच्या विश्वासाला तडा न जाऊ देता यावेळी गावाचे भूषण असणाऱ्या पुरातन किल्ल्याच्या तटबंदीसह पुनर्वसन विकासासाठी ९-१० कोटीचा निधी, तर मराठवाड्यातील सर्वात मोठ्या बुद्धविहारासाठी कोटींचा निधी, शादीखाना आणि स्मशानभूमीसाठीही भरीव निधी आणत एकंदरीत गावच्या सोयीसुविधांमधे तसुभरही कमतरता पडु दिली. शिवाय पुरात कालीन केदारेश्वराचे संवर्धन, हेमाडपंथी शिल्पकलांचे जतन यासाठी प्राधान्याने लक्ष घालून ते कार्य पार पाडून मंत्री पंकजा मुंडे, माजी मंत्री आ.धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन मरळशीद परिसर पर्यटन स्थळ आणि तेथील तीर्थक्षेत्र मल्लिकार्जुन मंदिर पुनर्वसन विकासासाठी मी कटीबद्ध असुन जिल्हाधिकारी यांची आणि ईतिहास संशोधक डॉ.सतिश साळुंखे यांनी स्वतः धर्मापुरी गावी भेट देऊन सर्व प्राचीन, पुरातत्त्व ऐतिहासिक ठेव्यांची पाहणी करून लवकरच त्याच्या जीर्णोद्धारास

आठी पुरातत्त्व विभागाकडून आणि डी.पी.डी.सी.अंतर्गत निधी उपलब्ध करून उर्वरित कामे करण्यासाठी सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे सांगितले असुन लवकरच परत पंकजाताई आणि धनंजय मुंडे साहेबांची भेट घेऊन आता एवढेच राहिलेले महत्वाचे काम पूर्ण करण्यासाठी मी बांधील असल्याचे सरपंच ड.गोविंदरावजी फड यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# अवैद्य विदेशी दारुची वाहतुक करणाऱ्यावर गुन्हा दाखल

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १८/०८/२०२५ रोजी अंबाजोगाई शहरात अवैद्यरित्या विना परवाना बेकायदेशीर रित्या विदेशी दारुची क्रेटा मधुन वाहतुक करीत आहेत. अशी गोपनिय बातमी मिळाल्यावरुन सहा. पोलीस अधिक्षक श्री शिंदे साहेब, व पोलीस स्टेशन अंबाजोगाई शहर येथील अधिकारी कर्मचारी यांनी कार्यवाही केली.

बालासाहेब माणिक केंद्रे रा. धावडी ता. अंबाजोगाई जि. बीड यांचेकडून क्रेटा गाडी क्रमांक चक१२ इन २२११ ही विदेशी दरुच्या बाटल्यासह एकूण १४,३७,८४० रुपयाचा माल जप्त करून पोस्टेला गुन्हा क्रमांक ४१६/२०२५ कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधिक्षक साहेब बीड, मा. अप्पर पोलीस अधिक्षक साहेब




बीड यांचे मार्गदर्शनाखाली अंबाजोगाई येथे नव्याने रुन्जू झालेले सहा. पोलीस अधिक्षक श्री शिंदे, पोलीस निरीक्षक शरद जोगदंड, पोउपनि शिंदे, पोह/१६७१ गायकवाड, पोह/१६९८ गुट्टे, पोह/१५७५ आचार्य, पोह/१४८५ वडकर, पोअं/१९५४ गायकवाड, पोर्डा/१९५४ गित्ते यांनी केली आहे.

## भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त

# बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र - डॉ.योगेश क्षीरसागर

बीड ।प्रतिनिधी

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त 'जनजाती गौरव' विशेष कार्यक्रमांतर्गत बीडमध्ये दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर आधारित हे चर्चासत्र २४ व २५ ऑगस्ट २०२५ रोजी पार पडणार असल्याची माहिती संयोजन समितीचे मार्गदर्शक तथा नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

बीडमध्ये सौ.के.एस.के. महाविद्यालयात बुधवारी दि.२० रोजी दुपारी १२.३० वाजता यासंदर्भात त्यांनी पत्रकार परिषद घेतली. यावेळी संयोजन



समितीचे सल्लागार डॉ.सुधाकर गुट्टे, परिषद संयोजक प्रा.हमराज उईके यांची उपस्थिती होती.या शैक्षणिक उपक्रमाचे आयोजन नवगण शिक्षण संस्था संचलित पाटोदा येथील वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाने केले असून भारतीय सामाजिक विज्ञान संशोधन परिषद, नवी दिल्ली आणि आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे या संस्थांचे सहकार्य लाभले आहे. जगभरात ३७ चर्चासत्र होत आहेत. त्यापैकी ५ आंतरराष्ट्रीय तर उर्वरित राष्ट्रीय पातळीवरील असतील. ५ आंतरराष्ट्रीय चर्चासत्रांपैकी बीडमध्ये १ होत आहे. यानिमित्ताने बीडचे नाव जगभरातील शैक्षणिक, सामाजिक वर्तुळात जाणार आहे.

२४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे उद्घाटन समारंभ होणार आहे. प्रमुख अतिथींमध्ये राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे मंत्री ना.डॉ.अशोक उईके, अन्न व औषध प्रशासन विभागाचे मंत्री ना.नरहरी झिरवळ, आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री ना.इंद्रनील नाईक, माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांचा समावेश आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय संशोधक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू, बीडचे जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक,

(उर्वरीत पान २ वर)

### संयोजन समितीतील सारथी...

संयोजन समितीचे मार्गदर्शक नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर हे आहेत. तसेच, आयोजक सचिव प्राचार्य आबासाहेब हंगे, सहसचिव डॉ.सिद्धार्थ जाधव, कोषाध्यक्ष डॉ. विश्वंभर देशमाने, सल्लागार डॉ. सुधाकर गुट्टे, परिषद संयोजक प्रा.हमराज उईके यांचा संयोजन समितीमध्ये समावेश आहे.

# जमियत ए उलेमा हिंद अंबड शहर व तालुका कमिटी गठीत

अंबड ।प्रतिनिधी

दि.१५ ऑगस्ट रोजी शमशिर मस्जिद अंबड येथे जमियत ए उलेमा जालना जिल्हा अध्यक्ष मौलाना हसन मिल्ली यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित बैठकीत जमियत ए उलेमा हिंद जालना शहर अध्यक्ष मुफ्ती फहीम साहेब यांच्या उपस्थितीत देशाच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त जमियत ए उलेमा हिंद ची अंबड शहर व तालुका कमिटी गठीत करण्यात आली यानिमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात मुफ्ती फहीम साहेब यांनी देशवासीयांना स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या व तसेच स्वातंत्र्यासाठी जमियत ए उलेमा हिंद च्या ऐतिहासिक योगदानावर प्रकाश टाकला.या कार्यक्रमात बोलताना मुफ्ती फहीम साहेब म्हणाले की भारत देश स्वातंत्र होण्याच्या आधी पासून सन १९१९ जमियत ए उलेमा हिंद ही एक अशी संघटना आहे.जी केवळ धार्मिकच नव्हे तर सामाजिक व राजकीय पातळीवरही सक्रिय राहून देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्वपूर्ण भूमिका बजावत आली आहे.ब्रिटिश सत्तेविरुद्ध ढणाऱ्या



क्रांतिकारकांना जमियतने दिलेले समर्थन,उलेमांनी तुरुंगवास भोगलेले अनुभव तसेच १९२० च्या दशकात जमियतने घेतलेले आंदोलनात्मक निर्णय जमियत ए उलेमा हिंद च्या अनेक उलेमांनी या काळात तुरुंगवास पत्करला,शिक्षांचे सामना आणि बलिदानही दिले सविस्तर माहिती दिली या कार्यक्रमात नव्याने गठीत अंबड शहर व तालुका कमेटी जमियत ए उलेमा हिंद जालना चे मुफ्ती रमजान साहेब यांच्या हस्ते तालुका अध्यक्ष

(उर्वरीत पान २ वर)

# एका दणक्यात जिल्हा बँकेचे रेस्ट हाऊस झाले रिकामे- ॲड. अजित देशमुख

बीड ।प्रतिनिधी

बीड येथे बदलून आलेले सहकार खात्याचे तालुका उपनिबंधक सहकारी संस्था, बीड या पदावर कार्यरत असलेले अधिकारी गेल्या दीड वर्षापासून बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या विश्रामगृहात बेकायदेशीर रितीने मुक्कामाला होते. त्यांनी तक्रारी नंतर कालच चंबू गबाळ आवरले. आता अधिकाऱ्यांनी बेकायदा वागू नये, असे जन आंदोलनाचे विश्वस्त ड. अजित एम. देशमुख यांनी म्हंटले आहे.

बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड, बीड ही सातत्याने वादाच्या भोवऱ्यात असते. जिल्हा बँक शेतकऱ्यांची बँक राहिलेली नसून पुढार्यांची बँक झालेली आहे. त्यामुळे सातत्याने मागणी लावून धरत तेथील संचालक मंडळ अस्तित्वात येऊ दिले नाही. मात्र या ठिकाणी नेमलेले प्रशासकीय अधिकारी बँकेच्या भल्यासाठी लक्ष देत नसल्याचे दिसत आहे.

जिल्हा बँकेच्या प्रशासकीय

(उर्वरीत पान २ वर)

# अंबड व घनसावंगी अनुदान घोटाळ्याती ; २८ जणांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल

अंबड ।प्रतिनिधी

सन २०२२-२३ व २०२३-२४ या कालावधीत अंबड व घनसावंगी तालुक्यात झालेल्या अतिवृष्टी, गारपीट आणि नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी शासनाने दिलेले अनुदान लाटून खाल्ले गेले. तब्बल २५ कोटी रुपयांचा घोटाळा उघडकीस आल्याने जिल्हा प्रशासन हादरले असून, अखेर मंगळवार दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी रात्री उशिरा अंबड पोलिस ठाण्यात २८ जणांविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला.नैसर्गिक आपत्तीमधील नुकसानीपोटी शासनाने शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट अनुदान जमा केले. मात्र, या प्रक्रियेत तहसीलदारांच्या ई-मेल आयडींचा गैरवापर, संगणकीय फेरफार आणि बनावट कागदपत्रांची निर्मिती करून शासनाची फसवणूक करण्यात आली. अशा संगनमताने २४ कोटी ९० लाख ७७ हजार ८११ रुपयांचा अपहार केल्याचे तपासात निष्पन्न झाले.तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी त्रिसदस्यीय चौकशी समिती नेमली होती. समितीने दिलेल्या अहवालानुसार तब्बल २१ तलाठ्यांना निलंबित करण्यात आले, तर इतरांविरुद्ध विभागीय चौकशीचे प्रस्ताव पाठविण्यात आले होते.हा मुद्दा विधीमंडळाच्या अधिवेशनातही मोठ्या प्रमाणावर गाजला होता.महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे व राज्यमंत्री आशिष जैस्वाल यांनी आधीच गुन्हे दाखल करण्याचे संकेत दिले होते. त्यानुसार विद्यमान जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी अंबडचे उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी यांना प्राधिकृत करून तक्रार नोंदविण्याच्या सूचना दिल्या. सहायक महसूल अधिकारी विलास कोमटवार यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला.फिर्यादीनुसार, आरोपींनी शासकीय निधी स्वतःच्या फायद्यासाठी बनावट दस्तऐवजाद्वारे हडप केला, संगणक प्रणालीत फेरफार केला, तसेच कागदोपत्री व संगणकीय अभिलेख नष्ट करून पुरावे मिटवण्याचा प्रयत्न केला.या घोटाळ्यातील आरोपींमध्ये महसूल विभागातील अधिकारी, कर्मचारी, संगणक ऑपरेटर व नेटवर्क इंजिनियर यांचा समावेश आहे.


१) गणेश ऋषींदर मिसाळ २) कैलास शिवाजीराव घारे ३) विठ्ठल प्रल्हादराव गाडेकर ४) बाळु लिंबाजी सानप ५) पवनसिंग हिरालाल सुलाने ६) शिवाजी श्रीधर ढालके ७) कल्याणसिंग अमरसिंग बमनावत ८) सुनिल रामकृष्ण सोरमारे ९) मोहित दत्तात्रय गोषिक १०) चंद्रकांत तुकाराम खिल्लारे ११) रामेश्वर नाना जाधव १२) डिगंबर गंगाराम कुरेवाड १३) किरण रविंद्रकुमार जाधव १४) रमेश लक्ष्मण कांबळे १५) सुकन्या श्रीकृष्णा गवते १६) कृष्णा दत्ता मुजगुले १७) विजय हनुमंत जोगदंड १८) निवास बाबुसिंग जाधव १९) विनोद जयराम ठाकरे २०) प्रविण भाऊसाहेब शिनगारे २१) बप्पासाहेब रखमाजी भुसारे २२) सुरज गोरख बिक्कड २३) सुशिल दिनकर जाधव (सहायक महसूल अधिकारी) २४) वैभव विश्वंभरराव आडगांवकर (नेटवर्क इंजिनियर) २५) विजय निवृत्ती भांडवले (तत्कालिन संगणक परिचालक) २६) रामेश्वर गणेश बारहाते (महसूल सेवक) २७) आशिष प्रमोदकुमार पैठणकर (सहायक महसूल अधिकारी) २८) दिनेश बेराड (सहायक महसूल अधिकारी) या आरोपींविरुद्ध भारतीय दंड विधान २०२३ चे कलम ३१६ (४), ३१६ (५), ३१८ (४), ३२४ (५), ३३६ (३), ३३८, ३४० (२), ३३९, २३८ (५) तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ चे कलम ५२, ५३ व माहिती तंत्रज्ञान अधिनियमाचे कलम ६६ (क) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस उपनिरीक्षक भगवान नरोडे यांनी ही कारवाई पोनि संतोष घोडके यांच्या मार्गदर्शनाखाली केली असून, पुढील तपास सपोनि अमोल गुरले करत आहेत.



# घुंगर्डे हादगाव येथे संत सेना महाराज पुण्यतिथी साजरी

शहागड।प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील घुंगर्डे हादगाव येथील दुर्गा माता मंदिरात नाभिक समाजाच्या वतीने संत सेना महाराज यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. सेना महाराज हे वारकरी संप्रदायातील संत असून त्यांना ज्ञानदेव- नामदेवांच्या परिवारातीलच एक मानले जाते. मध्य प्रदेशातील बांधवगड मध्ये जन्मलेल्या सेना महाराजांचा मूळ व्यवसाय नाभिकाचा होता. शरीराने आपले कर्तव्य पार पाडताना सेना महाराजांचे मन मात्र देवपूजा रमलेले असायचे. असा या थोर संताची पुण्यतिथी घुंगर्डे हादगाव येथील नाभिक समाजाच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी गावातील सर्व जाती धर्माचे नागरिक मोठ्या संख्येने तसेच महिलाही उपस्थित होत्या.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# डॉ.ओमप्रकाश शेटे यांची 'पुस्तक तुला'

## देवदूत प्रतिष्ठान चा प्रेरणादायी उपक्रम..!



दिंद्रुड ।प्रतिनिधी

आयुष्मान भारत-मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ.ओमप्रकाश शेटे यांचा वाढदिवस विविध सामाजिक, शैक्षणिक व लोकोपयोगी उपक्रमांनी साजरा करण्यात आला. डॉ.शेटे यांच्या हार-तुरे नको, पुस्तके द्या या आवाहनाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. यावेळी त्यांची पुस्तक तुला करण्यात आली. यांच्या वजनाऐवढे पुस्तके वाचनालयास भेट स्वरूपात देण्यात आले. विशेष म्हणजे तब्बल पंधरा तास उभा राहून डॉ.शेटे यांनी स्नेहीजनांच्या शुभेच्छा स्वीकारल्या.देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने विधवा महिलेस शिलाई मशीन देऊन स्वावलंबनाचा संदेश दिला गेला.

डॉ.ओमप्रकाश शेटे यांच्या वाढदिवसानिमित्त देवदूत प्रतिष्ठानच्या वतीने त्यांची ग्रंथ-तुला करण्यात आली. या प्रेरणादायी उपक्रमाने एक नवा आदर्श घडवला. आरोग्यदूत डॉ. शेटे यांनी वाढदिवसा निमित्ताने बुके ऐवजी पुस्तके भेट देण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला राज्यभरातून उदंड प्रतिसाद मिळाला. अनेकांनी विविध प्रकारची ग्रंथ, पुस्तके भेट देऊन उपक्रम यशस्वी केला. या उपक्रमातून मिळालेली हजारो पुस्तके वाचनालयाला देण्यात आली. या अभिनव उपक्रमामुळे वाचन संस्कृतीला चालना मिळणार आहे. त्यांच्या वजनाइतके ग्रंथ व पुस्तके तराजूच्या एका मापात ठेवून ही तुला करण्यात आली.

यावेळी देवदूत प्रतिष्ठान च्या वतीने एका विधवा महिलेस शिलाई मशीन भेट देण्यात आली. सदर महिलेची उपजीविका भागवता यावी व घरबसल्या रोजगार मिळावा असा या मागील उद्देश असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष बंडूजी खांडेकर यांनी सांगितले. तर जवळा येथील कुस्ती तालीम मधील मल्लांनी पुस्तकांसोबतच स्वतः च्या रक्ताने डॉ. शेटे यांचा फोटो काढून सदरील प्रतिमा भेट दिली. नागेश ठोंबरे व नागेश कानडे यांनी वाढदिवसानिमित्त शिवपार्वती गोशाळा येथील गायींसाठी चारा दिला. गोकुळअष्टमी निमित्त गोपूजन करण्यात आले.

आजच्या तंत्रज्ञानयुक्त आणि स्पर्धात्मक युगात वाचनाची सवय हळूहळू लोप पावताना दिसते. स्मार्टफोन आणि इंटरनेटच्या वर्चस्वामुळे तरुण पिढी मोबाइल स्क्रीनवर अधिक वेळ घालवते. पूर्वी पालक आणि शिक्षक मुलांना पुस्तके वाचण्यास प्रोत्साहित करत, परंतु आता माहिती एका क्लिकवर उपलब्ध असल्याने वाचनाची गोडी कमी होत आहे. तरीही, पुस्तकांचे महत्त्व कधीही कमी होत नाही. पुस्तके ही ज्ञानाची खाण आहे, जी व्यक्तीला विचारांची दिशा आणि प्रेरणा देते. वाचनालये आणि वाचनप्रेमी यासाठी सतत प्रयत्नशील असतात. डॉ.शेटे यांची पुस्तक-तुला हा उपक्रम केवळ पुस्तकांची देवाणघेवाण नव्हता, तर तो वाचन संस्कृतीला उजाळा देणारा एक संकल्प होता. हा उपक्रम समाजाला वाचनाचे महत्त्व पटवून देत, नव्या पिढीला प्रेरणा देणारा ठरेल.

## डॉ. गणेश डोळे सरांचा वाढदिवस सामान्य रुग्णांनी साजरा केला



बीड ।प्रतिनिधी

वेलनेस मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे अस्थिरोग तज्ञ डॉक्टर गणेश डोळे सर यांनी खूप कमी दिवसात भरपूर मेहनत केली.मितभाषा, सुसंस्कृत, स्मित हास्य, कमी बोलने, उच्च शिक्षण परफेक्ट ट्रीटमेंट, महात्मा फुले योजनेत बसून मोफत उपचार प्रसंगी कमीत कमी खर्चात चांगल्यात चांगले उपचार या सप्तसूत्रीच्या जोरावर फार कमी दिवसात बीड जिल्ह्यातील जनतेच्या मनात घर केले.

वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे अस्थिरोग तज्ञ.डॉ.गणेश डोळे सर, यांचा आज जन्मदिवस त्यांच्या वाढदिवसानिमित्त सकाळपासूनच जिल्ह्यातील वेगवेगळ्या भागातून त्यांच्या हातून बरे झालेले रुग्णांनी त्यांना शुभेच्छा देण्यासाठी गर्दी केली होती. प्रत्येकाने आपण कसे आजारी होतो आपल्याला किती त्रास होता. आपण किती ठिकाणी फिरलो आणि शेवटी औरंगाबाद, पुणे ला जाऊनही फायदा झाला नाही. पण, बीड येथील शिवराज पण सेंटरच्या समोर असलेल्या वेलनेस मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलचे हाडाचे डॉ.गणेश डोळे सर यांचे मुळेच आपण बरे झालो असे बोलून डॉक्टर साहेबांचे गोडवे गात होते. डॉक्टर साहेबांनी आम्हाला आमच्याकडे पैसे नसतानाही आम्हाला योजनेत बसून सर्व काही मोफत करून दिले असे बोलत होते. यावेळी दिवसभर बाहेरून आलेल्या लोकांनी डॉक्टरांना भरभरून शुभेच्छा व आशीर्वाद दिले.आई जगदंबा आपणास निरोगी व उदंड आयुष्य देवो आपल्या हातून अशीच ईश्वरसेवेसमान जनसेवा घडत राहो अशी सर्वांनीच जगदंबे चरणी प्रार्थना केली.

## मी वडार महाराष्ट्राचा सामाजिक संघटना याच्या वतीने हक्काच्या


### स्मशानभूमीसाठी.मा.तहसीलदार साहेब तहसील कार्यलय जाफ्राबाद यांना निवेदन देण्यात आले



जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफ्राबाद : - दि. २० जाफराबाद शहरात वडार समाजाच्या समस्यावर तोलमोल घेण्यासाठी दिनांक २०ऑगस्ट २०२५ रोजी ता. अध्यक्ष मी वडार महाराष्ट्राचा तसेच वडार समाजाच्या वतीने निवेदन मा. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आले. वडार समाज अनेक वर्षापासून जाफ्राबाद शहरातील खासगी जागेवर अंत्यसंस्कार करत असून त्यांना हक्काची स्मशानभूमी उपलब्ध नाही खासगी जागेवर अंत्यविधी करत आहे. व तेथे जाण्यासाठी रस्ता पावसाळ्यात खूप खराब होतो, यामुळे नातेवाईकांना आणि नागरिकांना मोठ्या अडचणीचा सामना करावा लागतो या निवेदनात म्हटले आहे की गट क्रमांक १० मध्ये भारत सरकार जमीन आहे त्यापैकी क्षेत्र १ हेक्टर ५५ आर जमीन या सरकारी जमिनीपैकी वडार समाजाला ३० आर जागा हक्काच्या स्मशानभूमी साठी देण्यात यावी तसेच यापुढे योग्य कार्यवाही झाली नाही येत्या एका महिन्याच्या आत वडार समाजाकडून लोकशाही पद्धतीने मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. या समस्येवर त्वरित निराकरण करण्यासाठी शासन आणि प्रशासनाकडे मी वडार महाराष्ट्राचा सामाजिक संघटना व वडार समाजाने मागणी केली आहे निवेदन देताना ता अध्यक्ष अशोक जाधव लहुजी शक्ती सेना ता. अध्यक्ष

## मांजरा धरण आणि परिसराच्या विकासासाठी कटिबद्ध : आ. नमिता मुंदडा



बीड ।प्रतिनिधी

मांजरा धरण ४६ वर्षांत १५ व्यांदा आणि आजवर ऑगस्ट महिन्यात दुसऱ्यांदा पूर्ण क्षमतेने भरल्याने धरणाच्या पाणलोट व लाभक्षेत्रात उत्साहाचे वातावरण आहे. आमदार नमिता मुंदडा यांनी वरूणराजाचे ऋण व्यक्त करून जलदेवतेचे विधीवत पूजन केले.

यावेळी त्यांनी परीसरातील शेतकरी व उपस्थित नागरिकांचे अभिनंदन केले. त्या म्हणाल्या, शेतीच्या समृद्धसाठी प्रत्येक थेंबाचे संवर्धन ही काळाची गरज आहे.धरणाच्या पाण्यावर शेतकऱ्यांचे आर्थिक गणित अवलंबून असल्याने यावेळी लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवांचा सन्मान आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते करण्यात आला.

मांजरा प्रकल्प विकासासाठी ४० कोटी रूपयांचा निधी केंद्र सरकार कडून मिळवण्यात यश आले असून या निधीतून जलसंपदा विभागाकडून विविध विकास कामे सुरू असल्याचे सांगून त्यांनी आणखी निधीसाठी आपण प्रयत्नशील असल्याचे सांगितले.मांजरा प्रकल्प हा तिनं जिल्ह्यातील एक महत्त्वाचा जलस्रोत असून अनेक शहरांना व गावांना पिण्याचे पाणी आणि सिंचनासाठी आधार आहे. शहरांनी पुरवठा होत असलेल्या पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे तसेच विना अपव्यय पुरवठा होईल याची काळजी घेणे ही काळाची गरज आहे.यंदा पावसाळ्यापुर्वी व मोसमी समाधानकारक पर्जन्यवृष्टीमुळे प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरला आहे. मागील पाच वर्षांपासून धरण सातत्याने भरत असून, त्यामुळे लाभक्षेत्रासह पाणलोट क्षेत्रातील शेतकऱ्यांमध्ये तसेच लातूर शहर, चखऊ, कळंब, अंबेजोगाई, केज-धारुर आदिंसह परीसरातील विविध साखर कारखान्याच्या कार्यक्षेत्रात आनंदाचे वातावरण आहे.

आदरणीय काकाजी नंदकिशोर मुंदडा यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना विविध बाबींवर प्रकाश टाकत शेतकऱ्यांचे अभिनंदन केले, याप्रसंगी धनेगाव पंचक्रोशीतील शेतकरी, लोकप्रतिनिधी,जलसंपदा विभागाचे कार्यकारी अभियंता अमरसिंह पाटील, कनिष्ठ अभियंता निकनवरे शाखा अभियंता गीरी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा धनेगाव ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक सरपंच मंगेश गुजर यांन केले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मा.सरपंच सतिश गुजर,,प्रभुलिंग गुजर,धनराज कंगले, श्रीराम इंगळे यांच्यासह ग्रामस्थांनी परीश्रम घेतले.

## केंद्रीय समुपदेशन प्रवेश फेरी : आयटीआय प्रवेशासाठी शेवटची संधी

### २२ आणि २३ ऑगस्टला ऑनलाईन हजेरी नोंदविण्याचे प्राचार्य संतोष लोखंडे यांचे आवाहन

परळी ।प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथ मुंडे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था परळी वैजनाथ येथे प्रवेश सत्र २०२५ करिता प्रवेश प्रक्रिया सुरू असून आजपर्यंत चौथी प्रवेश फेरी संपले आहे. यावर्षी आयटीआयची प्रवेश क्षमता २२४ असून यापैकी १७४ प्रवेश निश्चित झाले आहेत. उर्वरित ५० जागा केंद्रीय समुपदेशन फेरीतून भरल्या जाणार आहेत. या फेरी करिता विद्यार्थ्यांनी स्वतः लॉगिन करून २२ ते २३ ऑगस्ट रोजी ५ वाजेपर्यंत संस्था निवडण्याचे आवाहन संस्थेचे प्राचार्य संतोषजी लोखंडे यांनी केले आहे.

केंद्रीय समुपदेशन फेरीचे वेळापत्रक..उमेदवारांनी त्यांच्या लॉगिन मधून २२ व २३ -ीस हजेरी नोंदवणे त्यानंतर २५ आणि २६ ऑगस्ट रोजी स्लॉट नुसार हजर रहावे. १. सर्व अप्रवेशित उमेदवार या फेरीसाठी पात्र राहतील. २. २० ऑगस्ट २०२५ पर्यंत ज्या उमेदवारांनी अर्ज भरला आहे व निश्चित केला आहे ते उमेदवार सदरील फेरीस पात्र राहतील. ३. २१ ऑगस्ट २०२५ रोजी पाच वाजेपर्यंत समुपदेशन फेरीसाठी पात्र उमेदवार नव्याने भरलेल्या उमेदवारांची एकत्रित गुणवत्ता यादी प्रसिद्ध केली जाईल.४. २२ ऑगस्ट सकाळी ११ वाजेपासून ते २३ ऑगस्ट सायंकाळी पाच वाजेपर्यंत उमेदवारांनी रिक्त जागेचा आढावा घेऊन ज्या संस्थेत हव्या असणाऱ्या व्यवसायास रिक्त जागा असतील तेथे उपस्थिती आपले लॉगिन करून उपस्थिती नोंदवायची आहे. ५. संस्थेनिहाय नोंदवलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी व त्यानुसार स्लॉट हा उमेदवारांना २४ ऑगस्ट सायंकाळी पाच वाजेपर्यंत कळवला जाईल. ६. उमेदवाराने नोंदवलेल्या उपस्थिती मधील कुठल्याही एका संस्थेत व्यक्तिशः दिलेल्या स्लॉट मध्ये राहावे. ७. दिनांक २५ ऑगस्ट, २६ ऑगस्ट मध्ये जर जागावाटप झाली तर कागदपत्र व शुल्क भरून आपला प्रवेश निश्चित करावा.




संस्थास्तरीय समुपदेशन फेरी

२८ ते ३१ -ीस दररोज सर्व संस्थेत

१. २७ ऑगस्ट पाच वाजता सर्व रिक्त जागांचा तपशील वेबसाईटवर अद्यावत होईल.

२. सर्व अप्रवेशित उमेदवार सदरील फेरीस पात्र राहतील.

३. दिनांक २८ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट रोज सकाळी आठ ते बारा वाजेपर्यंत उमेदवाराने संस्थेत उपस्थित राहून हजेरी नोंदवणे.

४. दररोज दुपारी एक वाजता संस्था स्तरावर हजेरी नोंदवलेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी सिस्टीम देईल.

५. एक वाजेपासून सदरील गुणवत्ता यादीनुसार उमेदवारांना बोलवून जागावाटप करणे.

६. जागावाटप झाल्यानंतर त्याच दिवशी प्रवेश निश्चित करणे आवश्यक आहे.

संस्थेत रिक्त असलेल्या जागांचा तपशील

१. वायरमन (तारतंत्री ) : - ०१

२. फिटर (जोडारी) :- ०३

३. वेल्डर ( संधाता) :- ०८

४. शिटमेटल वर्कर (पत्रे कारागीर) :- २६

५. कॉम्प्युटर हार्डवेअर अँड नेटवर्क :- १०

६. ड्रेस मेकिंग :- ०२

वरील प्रमाणे संस्थेत विविध व्यवसायाच्या रिक्त जागा असून प्रवेश इच्छुक उमेदवारांनी प्रवेश प्रक्रियेत जास्तीत जास्त संख्येने सहभागी होऊन आपला प्रवेश निश्चित करावा.असे आवाहन संस्थेचे गटनदेशक श्री महादेव पुजारी, व प्रवेश प्रक्रिया प्रमुख श्री शेख असद सर आणि श्री काळे जी.जी, श्री विजयकुमार भुतके, श्री.ऋषिकेश खेडकर ,श्री. माळी सर,श्री.जाधव सर,श्री पवार सर,आदींनी केले.

## सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर पुर्णा पोलिसांची थरारक मॉक ड्रिल ;वजमाव नियंत्रणात प्रशिक्षणाचा विशेष सराव



पूर्णा/ प्रतिनिधी

आगामी सण-उत्सवांच्या काळात कायदा आणि सुव्यवस्था सुनिश्चित करण्यासाठी पुर्णा पोलीस प्रशासन सज्ज झाले आहे. शहर व परिसरात कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि अचानक उद्धवलेल्या परिस्थितीवर त्वरित नियंत्रण मिळावे, यासाठी (ता. १९) ऑगस्ट रोजी रेल्वे स्थानकाच्या मैदानावर शहरातील पोलीस दलाची 'मॉक ड्रिल' आयोजित करण्यात आली.

उप विभागीय पोलीस अधिकारी डॉ. समाधान पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलीस निरीक्षक विलास गोबाडे यांच्या नेतृत्वाखाली हा प्रात्यक्षिकांचा सराव पार पडला. मॉक ड्रिलदरम्यान पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना जमाव नियंत्रित करण्याचे विशेष प्रशिक्षण दिले गेले, ज्यामध्ये विविध आकस्मिक परिस्थिती हाताळण्याचे उपाय आणि तत्पर प्रतिसाद यांचा समावेश होता.या सरावात सहायक पोलीस निरीक्षक सोमेश्वर शिंदे, गजानन पाटील, रेखा शहारे, तसेच फौजदार श्रीनिवास पडलवार, प्रकाश इंगोले, अमेर चाऊस, वाल्मीक भोसले, सोनेराव जाधव, पुणेकर यांच्यासह जमादार श्याम काळे, रमेश मुजमुले, श्याम कुरील, मनोज नळगीरकर, रमाकांत टोटेवाड, बंडू राठोड, हजेरी मेजर तोंडेवार, पोका, संदिप चौरे, अजय माळकर, सुरेश राठोड, शेंबेवाड, टाकरस यांचाही सहभाग होता. शिवाय महिला व पुरुष होमगार्ड, तसेच परभणी पोलीस दलातील अधिकारी कर्मचारीही या सरावात सामील झाले.

सदर सरावामुळे पोलीस दलाची सण-उत्सवासाठीची तयारी अधिक मजबूत झाली असून, कोणत्याही आव्हानात्मक परिस्थितीला त्वरित तोंड देण्यासाठी पुर्णा पोलीस दल सज्ज असल्याचे स्पष्ट झाले. प्रशासनाच्या या पुढाकारामुळे नागरिकांमध्येही सुरक्षा व सुव्यवस्थेबाबत आत्मविश्वास

## धडकनाळ दुर्घटना : ४० तासांनंतर तिघांचे मृतदेह, एक महिला बेपत्ता

देगलूर, प्रतिनिधी

धडकनाळ येथे घडलेल्या भीषण अपघातात कार आणि ऑटो पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने तब्बल ४० तासांनंतर तिघांचे मृतदेह सापडले, तर अजूनही एका महिलेचा शोध सुरू आहे. ही हृदयद्रावक दुर्घटना १७ ऑगस्टच्या मध्यरात्री घडली.त्या रात्री धडकनाळ पुलावर कार व ऑटो थांबलेल्या असतानाच अचानक आलेल्या पुराच्या पाण्याच्या लोंढ्याने दोन्ही वाहने गाठली. या घटनेत कारमधील नारायण ईबिते व ऑटोतील आसिफ शेख आणि शोएब खान यांनी झाडावर चढून जीव वाचवला. मात्र, महबूब पिंजारी (३३), हसीना अब्दुल पाशा (३२), समीना रशीद शेख (४५) आणि आफरीन अलीम शेख (३०) हे चार जण पाण्याच्या प्रवाहात वाहून गेले.शोधमोहिम सुरू असताना १९ ऑगस्ट रोजी दुपारी साडेचारच्या सुमारास मुक्रमाबाद शिवारातील रावी परिसरात छोट्या नाल्यात तीन मृतदेह आढळले. त्यात महबूब पिंजारी, हसीना अब्दुल पाशा व समीना रशीद शेख यांचा समावेश आहे. तथापि, आफरीन अलीम शेख यांचा अद्यापही शोध सुरू असून बचाव पथक तिला शोधण्यासाठी प्रयत्नशील आहे.या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून, प्रशासनाकडून शोधकार्य अधिक गतीने करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ संपन्न

धर्माबाद / अशोक पडोळे

धर्माबाद शहरातील हुतात्मा पानसरे हायस्कूल, मधील फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये शालांत प्रमाणपत्र परीक्षेतून विशेष गुणसंपन्न व प्राविण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्ष विश्वनाथ पाटील बनाळीकर, प्रमुख पाहुणे धर्माबाद नगरपालिकेचे मुख्याधिकारी कौस्तुभ गव्हाणे, पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एस एन भडीकर, माजी शिक्षक वि.के.शिंदे पालक प्रतिनिधी डॉक्टर आबासाहेब पाटील, साईनाथ बुन्नोड, मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, उपस्थित होते. यावेळी माधव वडगावे संगीत शिक्षक व शुद्ध धन बनसोडे यांच्यातर्फे पानसरे गीत व स्वागत गीत सादर करण्यात आले. तदनंतर फेब्रुवारी मार्च २०२५ मध्ये विशेष प्राविण्य मिळवलेले अन्वी आबासाहेब पाटील तालुक्यात प्रथम, मोहन साईनाथ बुन्नोड, साक्षी मुंडकर, सोहम कदम, ७५ टक्के अधिक गुण घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी धर्माबाद पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक एस एन भडीकर गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करत असताना शाळेतील संगीत संचालन गायलेल्या मुलांचं अभिनंदन करण्यात आलं शिक्षण हे अक्षर ओळख नसून आपले चरित्र निर्माण करण्याचे कार्य आहे शिक्षणामुळे स्वतः आपल्या कुटुंबाचा व देशाचा विकास होतो आजचे शिक्षण हे नोकरीच माध्यम आहे परंतु आजचे विद्यार्थ्यांना शिक्षण घेत असताना आज मात्र स्पर्धा परीक्षेतून स्पर्धा



परीक्षा माध्यमातून जीवन उंच वाढवावी पाचवी ते दहावी विद्यार्थ्यांनी पुस्तके सांभाळून ठेवावे ते स्पर्धा परीक्षेच्या आवश्यक आहेत.. मोबाईल फेसबुक इंस्टाग्राम यापासून विद्यार्थ्यांनी दूर राहावे. तसेच शालेय व कॉलेज जीवनामध्ये मध्यपान धूम्रपान शारीरिक आजार होणारे अशा पासून दूर राहावी विद्यार्थ्यांनी गुणवंत होत असताना जिद्द ध्येय आत्मसात करावे सामान्य कुटुंबातील विद्यार्थी सुद्धा सुवर्णपदक मिळू शकतो अधिक परिश्रम करावे असे आवाहन केले .. तालुक्यात प्रथम व विविध विषयांमध्ये पैकीच्या पैकी गुण घेतलेल्या विद्यार्थ्यांना डॉक्टर किशन पाटील बनाळीकर येथे कार्य केलेली कै. डॉक्टर विश्वनाथ पाटील बाळापूरकर कै. मुदगलकर सर यांच्या स्मरणात विद्यार्थ्यांना विविध विषय शिक्षकाकडून बक्षीसे वाटप करण्यात आली.सदरील कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक सन्मुख बेंबरेकर, सूत्रसंचालन उदयकुमार सोवळे, आभार अरुण भुसलवाड यांनी केले.

कृषी महाविद्यालय आष्टी येथील कृषीदुतांकडून मोराळा येथे

# बोर्डेक्स पेस्टचे यशस्वी प्रात्यक्षिक, शेतकऱ्यांच्या ज्ञानात भर

बीड ।प्रतिनिधी

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी अंतर्गत श्री छत्रपती शाहू, फुले,आंबेडकर कृषी महाविद्यालय आष्टी येथील कृषी दुतांनी मौजे मोराळा येथे ग्रामस्थांसाठी बोर्डेक्स पेस्ट प्रात्यक्षिकाचे यशस्वी आयोजन केले या उपक्रमात कृषी दुतांनी गावकऱ्यांना बोर्डेक्स पेस्ट कसे तयार करावे त्याचे फायदे आणि शेतीत त्याचा प्रभावी वापर कसा करावा याची सविस्तर माहिती दिली बोर्डेक्स पेस्ट हे पिकांसाठी एक महत्त्वाची बुरशीनाशक असून ते पिकांचे विविध रोगांपासून संरक्षण करून उत्पादन वाढीस हातभार लावते विद्यार्थ्यांकडून प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाद्वारे हे पेस्ट तयार करण्याची सांगितल्याने गावकऱ्यांनी त्यात पद्धत समजावून विशेष रुची दाखवली अनेक शेतकऱ्यांनी या प्रात्यक्षिकाचा उपयोग करून आपल्या शेतात बोर्डेक्स पेस्ट तयार करून वापरण्याची तयारी दर्शवली यामुळे त्यांच्या कृषी ज्ञानात भर पडल्याचे समाधान शेतकऱ्यांनी व्यक्त केले




हा उपक्रम गावकऱ्यांसाठी अत्यंत लाभदाय ठरला असून यामुळे त्यांच्या शेतीतले ज्ञान अधिक प्रगल्भक होईल असा विश्वास व्यक्त करण्यात आला.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरसूळ. एस.आर, कार्यक्रमाचे समन्वयक प्राध्यापक तांबोळी आय.एम., उपक्रमाचे कार्यक्रम अधिकारी प्राध्यापक मिसाळ एल. एस आणि विषय तज्ञ प्राध्यापक साबळे एम व्ही. यांचे मार्गदर्शन लाभले यावेळी कृषी दुत शिंदे पृथ्वीराज, राठोड शुभम, कांबळे अनिकेत, ससाणे सुमेध,गीते सुजित,अजय जेडिया,पठारे विनोद,सुरेशकुमार,फुलमाळी सागर उपस्थित होते

# शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे: खासदार डॉ. कल्याण काळे यांनी सरकारकडे केली मदतीची मागणी

जालना ।प्रतिनिधी

जालना जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या संकटाच्या काळात जालना लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. कल्याण काळे यांनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या भावना जाणून घेत त्यांना आधार दिला आहे. त्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना एक पत्र पाठवून, तातडीने नुकसानीचा पंचनामा करून शेतकऱ्यांना योग्य ती मदत मिळवून देण्याची विनंती केली आहे.

भावपूर्ण आवाहन

डॉ. कल्याण काळे यांनी आपल्या पत्रात म्हटले आहे की, पावसाने शेतीचे मोठे नुकसान

## पंचनामा आणि मदतीची अपेक्षा

पत्रात त्यांनी जिल्हा प्रशासनाला विनंती केली आहे की, त्यांनी तातडीने पाहणी करावी आणि शेतकऱ्यांनी गमावलेल्या पिकांचा पंचनामा करून त्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी. पत्रात त्यांनी नमूद केले आहे की, ही मदत शेतकऱ्यांसाठी केवळ आर्थिक आधार नसून, त्यांच्या हिंमतीला बळ देणारी ठरेल.



झाल्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यांचे कष्ट एका क्षणात वाया गेले आहेत. त्यांनी पत्रातून शेतकऱ्यांच्या वेदना मांडल्या आहेत. त्यांनी सरकारला आवाहन केले आहे की, या संकटाच्या वेळी आपण सर्वांनी मिळून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे गरजेचे आहे.

खासदारांचे संवेदनशील पाऊल

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी घेतलेल्या या संवेदनशील भूमिकेमुळे शेतकऱ्यांमध्ये एक सकारात्मक भावना निर्माण झाली आहे. आपल्या लोकप्रतिनिधीला आपल्या दुःखाची जाणीव आहे, हे पाहून त्यांना दिलासा मिळाला आहे. आता शासन यावर काय पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# महाबोधी महाविहार (बोधगया, बिहार) मुक्तीसाठी जनसंवाद व धम्मध्वज यात्रा

## २३ ऑगस्ट रोजी जालना येथे भव्य आयोजन

जालना । प्रतिनिधी

बौद्ध धम्माच्या केंद्रस्थानी असलेल्या महाबोधी महाविहार, बोधगया (बिहार) या पवित्र स्थळाच्या संपूर्ण मुक्तीच्या समर्थनार्थ, बुद्धिस्ट समन्वय संघ महाराष्ट्र यांच्या वतीने पूज्य भन्ते विनाचार्य यांच्या नेतृत्वाखाली जनसंवाद आणि पंचशील धम्मध्वज यात्रा चे भव्य आयोजन करण्यात आले आहे.प्रमुख मागण्या बुद्धगया (बिहार) येथील महाबोधी महाविहार मुक्त करण्यात यावे.जालना येथील मोती तलावात तथागत भगवान गौतम बुध्दांची मूर्ती बसवण्यात यावी या मागण्या संदर्भात ही यात्रा दि. २३ ऑगस्ट २०२५, शनिवार रोजी सकाळी ११ वाजता जालना येथील मंठा चौफुली येथून प्रारंभ होणार असून, पूज्य भिक्खू संघ, उपासक-उपासिका संघ आणि विविध बौद्ध अनुयायांच्या सहभागातून ही धम्म पदयात्रा मार्गस्थ होईल.यात्रेचा समारोप अंबड चौफुली, जालना येथे होणार असून, त्यानंतर दुपारी १ वाजता गायत्री लॉन्स, अंबड चौफुली येथे जनसंवाद व धम्मप्रेरणादायी कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.या कार्यक्रमाच्या आयोजनात पुढील प्रमुख व्यक्तींचा मोलाचा सहभाग आहे:हरिष रत्नपारखे, महेंद्र बनकर, जी.एस. गाडेकर,हिवाळे सर, राहुल रत्नपारखे,मुरलीधर बोबडे,गौतम वाघमारे आदींसह इतर कार्यकर्ते.या उपक्रमाला धार्मिक, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील अनेक संघटना, कार्यकर्ते, उपासक-उपासिका मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.या यात्रेचा उद्देश म्हणजे महाबोधी महाविहाराचे पूर्ण व्यवस्थापन बौद्ध समाजाच्या हाती देण्याचा आवाज बुलंद करणे आणि धम्मप्रबोधन करणे हा आहे.कार्यक्रमासाठी बुद्धविहार समन्वय समिती, जालना जिल्हा यांनी सर्व बौद्ध बांधवांना, उपासक-उपासिकांना आणि धम्मप्रेमींना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन

# डोईफोडवाडी येथे ह भ प उद्धव महाराज चोले यांचे कीर्तन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील डोईफोडवाडी येथे अखंड हरिनाम सप्ताह गेली तीस वर्षापासून चालत आलेला आहे. याही वर्षी या सप्ताहाची सुरुवात मोठ्या उत्साहात झाली आहे. सप्ताहाच्या तिसऱ्या दिवशीची किर्तन सेवा ह भ प उद्धव महाराज चोले खडकी घाट यांनी केली.

श्रावणी सोमवारचं प्रसंगावधान पाहून शिवभोळा चक्रवर्ती माझे चित्त त्याच्या पायी या अभंगावर सविस्तर असं विवेचन केले यावेळी बोलताना महाराज म्हणाले की,माणूस



कुणालाच भेत नाही परंतु मरणाला भितो मरणाची भीती टाळण्यासाठी शिव आराधना करणे आवश्यक आहे. यामुळे भीती टळते पण मरण मात्र टळू शकत नाही. मरण येणारच याबरोबरच महाराजांनी व्यसनाधीनता व व्यसनाधीनतेने तरुण पिढी कशी बरबाद झाली आहे. तसेच सामाजिक समता व मानवी वर्तन या सर्व विषयांना हात घातला. यावेळी गावातील तरुण मंडळी, भजनी मंडळी, स्त्री-पुरुष व बाहेरगावची मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. अशी माहिती मा सरपंच प्रा. तात्यासाहेब डोईफोडे यांनी दिली.

# ऑरेंज व यलो अलर्टच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी व प्रशासनाने सतर्क राहण्याचे विभागीय आयुक्तांचे आवाहन

छत्रपती संभाजीनगर ।प्रतिनिधी

भारतीय हवामान विभाग, मुंबई यांनी दिलेल्या इशाऱ्यानुसार आज दिनांक १८ ऑगस्ट, २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड व लातूर जिल्ह्यांना ऑरेंज अलर्ट तर परभणी, हिंगोली, नांदेड आणि धाराशिव जिल्ह्यांना यलो अलर्ट देण्यात आला आहे. दिनांक १९ ऑगस्ट २०२५ रोजी धाराशिव वगळता सर्व जिल्ह्यांना यलो अलर्ट जारी करण्यात आला असल्याने नागरिकांनी व प्रशासनाने सतर्क रहावे, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे.

मा. मुख्यमंत्री महोदय यांनी आज व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे पूर परिस्थितीचा आढावा घेतला व झालेल्या नुकसानीचे योग्य प्रकारे पंचनामे करून शासनास अहवाल सादर करावा, पर्यटन स्थळे, धबधबे व गर्दीची ठिकाणे येथे स्थानिक पोलीस प्रशासनाकडून नागरिकांची सुरक्षितता सुनिश्चित करावी व आवश्यक ती काळजी घेण्यात यावी, जिल्हाधिकारी यांनी स्थानिक संभाव्य पूर परिस्थितीचा विचार करून जिल्ह्यातील सर्व शासकीय तसेच खाजगी शाळांना सुट्टी संदर्भातील निर्णय घ्यावा, स्थलांतरित नागरिकांच्या निवारा केंद्रांमध्ये योग्य सोयी-सुविधा, अन्न व वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. नागरिकांनी नदी, नाले, बंधारे, धरण परिसरात जाणे टाळावे व प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, तसेच अफवांवर विश्वास न ठेवता फक्त अधिकृत स्त्रोतांवरूनच माहिती घ्यावी असे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागात आज रोजी ३२.३० मि.मी. पर्जन्यमानाची नोंद झाली असून, विभागातील ५७ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली आहे.तसेच दि.१४.०८.२०२५ पुन १८.०८.२०२५ अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीबाबत जिल्ह्याकडून प्राप्त प्राथमिक माहिती नुसार विभागातील एकूण १००४ गावे बाधित झालेली असून ०१ व्यक्ती जखमी तर ०६ व्यक्ती मयत (हिंगोली-०१,नांदेड-०३,बीड-०२) झालेल्या आहे.तर एकूण २०५ जनावरे मयत(दुधाळ मोठी-६९,दुधाळ लहान-१०२,ओढकाम करणारी मोठी-२८, ओढकाम करणारी लहान-०६) झालेली आहे.तर अंशतः पडझड झालेल्या घरांची संख्या एकूण - ४८६ आहे.शेती पिक नुकसानीच्या प्राथमिक माहिती अहवालानुसार एकूण ३,२९,५०९ शेतकरी बाधित झाले असून २,८०,८६१.०२ हे.आर क्षेत्राचे (जिरायत-२७२५०७.०२,बागायत-८१५८,फळपिक-१९६ हे.आर) नुकसान झाले आहे.

# मुखेड तालुक्यातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी ५० हजार रुपये मदत द्या- मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणविस यांच्याकडे शहर काँग्रेसची मागणी

मुखेड -(ता. प्रतिनिधी)

तालुक्यातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना व कुटुंबांना आर्थिक नुकसान भरपाई देण्यात यावी अशा आशयाचे निवेदन शहर काँग्रेसच्या वतीने महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव डॉ.श्रावण रॅपणवाड, काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर यांच्या नेतृत्वात मा.तहसिलदार मुखेड द्वारा महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणविस यांना देण्यात आले.

मुखेड तालुक्यात दि १७.०८.२०२५ च्या रात्री मौ. रावणगाव,हसनाळ,भेंडेगाव खु.भिंगोली,भासवाडी,सांगवी भादेव,ईटग्याळ सह परिसरातील गावात ढगसदृष्य पाऊस झाल्यामुळे शेकडो हेक्टर शेती पाण्याखाली जाऊन या भागातील शेतीचे व कुटुंबाचे अतोनात नुकसान झालेले असुन अनेक घरांची पडझड होऊन घरात पाणी शिरल्यामुळे शेतकरी कुटूंबाचे संसार ऊपयोगी साहीत्य पुरात वाहुन गेल्यामुळे शेकडो कुटुंब उघडयावर पडले आहेत.शेकडो



जनावरे मृत्युमुखी पडले असुन पुराच्या पाण्यात कित्येक नागरीक बेपत्ता असुन दि.१८.०८.२०२५ च्या रात्रीपर्यंत ३ ते ४ नागरीकांचे मृतदेह सापडले आहेत.या ढगसदृष्य पावसाच्या पुरामुळे शेतकऱ्यांचे अफाट नुकसान झालेले असुन मुखेड तालुक्यातील पुरग्रस्त शेतकऱ्यांना शेतीचे नुकसान भरपाई म्हणुन प्रतिहेक्टरी ५० हजार रुपय दयावेत व पडझड झालेल्या उध्वस्त कुटुंबाना प्रतिकुटुंब २५ हजार रुपय मदत म्हणुन दयावी.शेतीचे व घराचे पंचनामे तात्काळ होण्यासाठी संबंधित विभागास सुचना देऊन मुखेड तालुक्यातील पुरग्रस्त शेतकरी कुटुंबाना न्याय देण्याची मागणी शहर काँग्रसने केली असुन,तालुक्यातील पुरग्रस्त भागात खा.प्रा.रविंद्रजी चव्हाण साहेब,माजी.आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर व काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शेतकरी कुटुंबाना प्रत्यक्ष भेटून समस्या जाणुन घेतल्या.या निवेदनावर महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे महासचिव डॉ.श्रावण रॅपणवाड,काँग्रेस शहराध्यक्ष हणमंत नारनाळीकर,युवक काँग्रेस शहराध्यक्ष जयप्रकाश कानगुले,अल्पसंख्यांक सेल काँग्रेस अध्यक्ष ईमराण पठाण,मागासवर्गीय काँग्रेस सेल शहराध्यक्ष बालाजी साबणे,तालुका काँग्रेस सचिव रामेश्वर पाटील इंगोले,तालुका युवक काँग्रेस उपाध्यक्ष एम.आर.

गोपणर,जिल्हा युवक काँग्रेस सचिव सुनिल पाटील आरगिळे,काँग्रेस शहर उपाध्यक्ष बालाजी वाडेकर,उपाध्यक्ष शिवाजी गायकवाड,आदिवासी कोळी समाजाचे नेते मारोतराव मामीलवाड सह मुखेड

# मुखेड तालुक्यात मुसळधार पावसाचा तडाखा; जनजीवन विस्कळीत

## ३ महिलांचा मृत्यू, ५६ जनावरे वाहून गेली; हजारो हेक्टरवरील पिके जलमय

मुखेड (प्रतिनिधी)

मुखेड तालुक्यात दि. १७ रोजी मध्यरात्री झालेल्या मुसळधार पावसाने तालुक्याचा चेहरा विद्रूप केला. लेंडी धरण परिसरासह रावणगाव, हसनाळ, भिंगोली, भासवाडी, पिंगोली, मारजवाडी, भेंडेगाव, सांगवी मादेव या गावांमध्ये अचानक पाण्याचा लोट घुसला. या आपत्तीत ३ महिलांचा मृत्यू झाला असून ५६ जनावरे वाहून गेली आहेत. ३७ घरांची पडझड झाली असून ५१ हजार २३० हेक्टर क्षेत्रातील पिकांना फटका बसला आहे.हसनाळ (पु.मु.) गावात गंगाबाई गंगाराम मादाळे (६०), निमाबाई हिरामण मादाळे (५५) आणि ललिता गोविंद शिंदे (५५) या तिघींचा मृत्यू झाला. सकाळपासून सुरू असलेल्या शोधमोहीमेत गावकऱ्यांनी मृतदेह बाहेर काढले. अजूनही काही नागरिक बेपत्ता असल्याची माहिती स्थानिकांनी दिली आहे.

पूरामुळे शेतकऱ्यांचे हाताशी आलेले पिके, साठवलेले धान्य, जनावरांचे खाद्य व घरातील संसारोपयोगी साहित्य वाहून गेले. अनेक कुटुंबांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. नागरिकांना रात्रभर घराबाहेर काढून सुरक्षित स्थळी थांबावे लागले.

रावणगावात २२५ नागरिक अडकले

रावणगावात तब्बल २२५ नागरिक अडकले होते. हसनाळ येथे आठ जणांनी बुरुजावर, तर इतर काहींनी मशिदीवर आणि झाडांवर चढून जीव वाचवला. सकाळपासून महसूल, एसडीआरएफ, पोलीस व आर्मीचे जवान घटनास्थळी बचावकार्य करीत आहेत.

आमदार राठोड यांचा आढावा

पूरस्थितीवर आमदार डॉ. तुषार राठोड यांनी प्रशासनाशी



संपर्क साधून मदतकार्य गतीमान करण्याच्या सूचना दिल्या. उपविभागीय अधिकारी अनुप पाटील, तहसीलदार राजेश जाधव व गटविकास अधिकारी रामोड हे रात्रीपासून घटनास्थळी दाखल राहून नागरिकांना मदतकार्य पुरवीत आहेत.सरकारकडून मदतीचे आश्वासन

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पूरस्थितीचा आढावा घेतला. सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी ठाम उभे आहे. पूर ओसरल्यानंतर पंचनामे करून नुकसानग्रस्तांना मदत केली जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.खासदार चव्हाण व माजी आमदार बेटमोगरेकर यांची भेट

पूरग्रस्त भागाला खासदार रवींद्र चव्हाण व माजी आमदार हणमंतराव पाटील बेटमोगरेकर यांनी भेट देऊन ग्रामस्थांच्या व्यथा जाणून घेतल्या. प्रशासनाला तातडीने मदतकार्य गतीमान करण्याचे निर्देश त्यांनी दिले.दरम्यान, एसडीआरएफच्या जवानांनी आतापर्यंत २५० हून अधिक नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. प्रशासन, पोलीस, एसडीआरएफ आणि आर्मी यांच्या संयुक्त प्रयत्नामुळे मोठी जीवितहानी टळली आहे.

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



## पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणा– या पात्र व्यक्तींनी अर्ज सादर करावेत

बीड ।प्रतिनिधी

जिल्हाधिकारी बीड यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १५ जुलै २०२५ रोजी जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत बैठक घेण्यात आली होती. या बैठकी दरम्यान पर्यावरण मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या १ सप्टेंबर २०१५ च्या आदेशानुसार जिल्हा पर्यावरण समितीमध्ये पर्यावरण क्षेत्रातील २ तज्ज्ञ प्रतिनिधी तसेच पर्यावरण क्षेत्रात काम करणा–या जिल्ह्यातील अशासकीय सेवाभावी संस्थेचे २ प्रतिनिधी नियुक्त करावयाचे आहेत. पर्यावरण क्षेत्रात काम करु इच्छिणा–या पात्र व्यक्तींनी जिल्हाधिकारी बीड या कार्यालयात आवश्यक त्या कागदपत्रासह १५ दिवसाच्या आत अर्ज सादर करावेत, जेणे करुन पात्र व्यक्तींची जिल्हा पर्यावरण समितीमध्ये शासन निर्णयानुसार निवड करुन जिल्हा पर्यावरण समिती गठीत करता येईल, असे उप प्रादेशिक अधिकारी म.प्र. नि. मंडळ जालना तथा समन्वयक बीड जिल्हा पर्यावरण समिती यांनी कळविले आहे.

## हरवलेल्या व्यक्तीबाबत निवेदन

बीड ।प्रतिनिधी

पोलीस ठाणे श्रीगोंदा,जि. अहिल्यानगर गुरन- २८७/२०२४ कलम ३६३ भादवी प्रमाणे दाखल झालेल्या गुन्हयातील पिडीत अल्पवयीन मुलगी कविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल ता. आष्टी,जि. दि. १४/०३/२०२४ रोजीचे २१.०० ते दि.१५.०३.२०२४ रोजीचे पाहटे ३.०० वाजेच्या दरम्यान श्रीगोंदा कारखाना ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथून अज्ञात इसमाने अज्ञात कारणा करिता पळवून नेले आहे. सदर मुलीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.नाव सविता अशोक वामन वय १७ वर्षे ६ महिने रा. गौखेल,ता. आष्टी, जि. बीड रंग गोरा, उंची सव्वा पाच फुट, गुलाबी रंगाचा व त्यावर फुले फुले असलेला पंजाबी ड्रेस, पायात काळया रंगाचे सॅंडल, उजव्या बाजुच्या गालावर खड्डा.वरील वर्णनाच्या मुलीची माहिती मिळाल्यास किंवा आढळून आल्यास पोलीस ठाणे श्रीगोंदा, पोलीस उपनिरीक्षक पोलीस स्टेशन श्रीगोंदाचे पोलीस उपनिरीक्षक यांच्याशी संपर्क साधावा, असे पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक मनोहर एच खिदळाकर यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे कळविले आहे. कोणास सदर मुलगी दिसल्यास कृपया त्वरित मो.क्र.९८८१७३१७२१ यावर संपर्क साधावा:

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करा –उपसभापती श्रीहरी मोरे

### हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी

माजलगाव ।प्रतिनिधी

तालुक्यात गेल्या ५ ते ६ दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकरी बांधवांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी(नाना) मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.



गेल्या ५ ते ६ दिवसापासून माजलगाव तालुक्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन,तूर,कापूस, बाजरी, हे पिके पूर्णतः पाण्यात गेले असून ऊस देखील बऱ्याचठिकानी खाली पडून शेतकरी बांधवांच्या हाता तोंडाशी आलेला घास निघून गेल्याने शेतकरी बांधव हातबल झालेले असून प्रशासनाने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी(नाना) मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## अहिल्यादेवी होळकर अध्यापक महाविद्यालयात एम. ए. शिक्षणशास्त्र अभ्यासक्रम सुरु

गेवराई ।प्रतिनिधी

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर अध्यापक महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने एम ए. शिक्षणशास्त्र (एम.एड समकक्ष ) अभ्यास केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली असून इच्छुकांनी प्रवेश घेण्याचे आवाहन जगदंबा शिक्षण संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

जगदंबा शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर अध्यापक महाविद्यालय शिवाजीनगर गढी. येथे यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून एम. ए. शिक्षणशास्त्र ( एम.एड समकक्ष) अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या शैक्षणिक संकुलात राजमाता जिजाऊ डी.एड कॉलेज, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले डी.एड कॉलेज, ताराराणी डी.एड कॉलेज सुरू असून या शैक्षणिक संकुलात सध्या डी.एड/ बी.एड महाविद्यालय सुरू असून एम. एड. सुरू करण्यासाठी जगदंबा शिक्षण संस्थेचे प्रयत्न होते. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून एम. ए. शिक्षणशास्त्र ( एम.एड समकक्ष) अभ्यासक्रम सुरू करण्यास मान्यता दिली आहे. या अध्यापक महाविद्यालयात एम.ए शिक्षणशास्त्र एम.एड समकक्ष विभाग सुरू करण्यात आला आहे.

## उपविभागीय पोलीस अधिकारी अंबाजोगाई यांनी महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे केलेली कार्यवाही

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १९/०८/२०२५ रोजी मा. श्री. ऋषिकेश शिंदे, सहाय्यक पोलीस अधिक्षक, उपविभाग अंबाजोगाई यांचे आदेशान्वये अंबाजोगाई शहरामध्ये अवैधरित्या मटका जुगार खेळणारे व खेळविणारे ईसमांवर जुगार रेड करण्याचे आदेश दिल्याने गोपनिय माहीती वरुन अंबाजोगाई शहरामध्ये जुगार रेड केली. यावेळी राहुल गायकवाड,असलम मोईम शेख,महेश शिवराम घुले, सोमनाथ सुदाम पवार व बुक्की मालक, चौद गवळी,गणेश नागरगोजे, अन्वर सय्यद सर्व राहणार अंबाजोगाई यांचेवर जुगार रेड करुन त्यांचे ताब्यातून जुगार साहोत्य व नगदी पैसे ६०७९०/- रुपायाचा माल मिळून आल्याने त्यांचे विरुध्द पोलीस स्टेशन स्टेशन अंबाजोगाई शहर येथेचे कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक अधिनियम प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कार्यवाही ही मा. नवनित कौवत, पोलीस अधिक्षक बोड, श्रीमती चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक अंबाजोगाई यांचे मार्गदर्शनाखाली श्री. ऋऋषीकेश शिंदे, सहाय्यक पोलीस अधिक्षक अंबाजोगाई, पोउपनी संजय फड, महादेव आवले, मुकेश खरटमोल, अशोक खेलबुडे नेमणुक उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उपविभाग अंबाजोगाई व पोलीस कर्मचारी हनुमंत चादर, भागवत नागरगोजे, नेमणुक अंबाजोगाई शहर यांनी केली असुन पुढील तपास पोलीस हवालदार विजयकुमार गायकवाड हे करीत आहेत.



श्री. मिर्झा शौकत बेग व श्री. मिर्झा शहानवाज बेग यांच्या मार्गदर्शनाखाली मिर्झा अरहान बेग याची फिजिक्स इंजिनियर मध्ये एनआयटी कालीकट, केरळ येथे निवड झाल्याबद्दल त्याचा सन्मान करतांना छत्रपती संभाजीनगर चे सिडको, सिईओ भा. प्र. से. श्री. जगदीश मिनियार साहेब, गुरुकुल क्लासेस चे श्री. प्रदीप गिरी व श्री. संतोष तायडे दिसत आहेत.

## धस कुटुंबाशी एकनिष्ठ असणारे सुप्रसिद्ध विधिज्ञ बाळासाहेब मोरे यांना भविष्यात राजकारणात चांगले स्थान देऊ - युवा नेते सागर आप्पा धस

### विधिज्ञ बाळासाहेब मोरे यांच्यावर वाढदिवसानिमित्त युवा ब्रिगेडचा शुभेच्छांचा वर्षाव

आष्टी (प्रतिनिधी) आष्टी न्यायालयातील सुप्रसिद्ध विधिज्ञ, अगदी कमी कालावधीमध्ये आपल्या बुद्धी कौशल्याच्या व संघटनात्मक बांधणी करत आष्टी तालुक्यात नव्हे तर अगदी बाहेरच्या जिल्ह्यात देखील मोठा मित्रपरिवार जमवून एक आपली वेगळीच ओळख निर्माण करून नावा रुपाला आलेले व नेहमीच आमच्या धस कुटुंबाशी एकनिष्ठेने व या मतदारसंघाचे आ. सुरेश आण्णा धस यांच्याबरोबर अगदी आपल्या कॉलेजच्या जीवनापासून सोबत असणारे युवा कार्यकर्ते विधिज्ञ बाळासाहेब मोरे यांना नक्कीच येणाऱ्या काही काळात राजकारणामध्ये चांगले स्थान देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करु असे प्रतिपादन बाळासाहेब मोरे यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याप्रसंगी मोरेश्वर लॉन्स येथे आयोजित कार्यक्रमात युवा नेते सागर सुरेश धस यांनी केले.

विधिज्ञ बाळासाहेब मोरे व त्यांची कन्या कु. वृंदा या बाप - लेकीचा एकाच दिवशी वाढदिवस म्हणजे दुग्ध शर्करा योग होय. विधिज्ञ बाळासाहेब मोरे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी अगदी जिल्हाभरातून नव्हे तर बाहेरच्या जिल्ह्यातून देखील त्यांचा मोठा मित्रपरिवार जमा झाला होता. यावेळी सागर धस पुढे बोलतांना म्हणाले की, आज मी बाळासाहेब मोरे यांचा वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन सोहळा पाहत असताना आम्हाला असे म्हणावेसे वाटते की, कुठलीही राजकीय पार्श्वभूमी नसणारा एक उमदा युवा कार्यकर्ता वकील व्यवसायातून सेवाभावी वृत्तीने काम करत आहेत.

आज आपल्या समाजामध्ये अनेक लोक पहावयास मिळतात यामध्ये बरेच लोक पैशाच्या मागे धावतात मात्र पैसा हे सर्वस्व नसून माणुसकी व माणूसपण जपले पाहिजे याच गोष्टीचा अवलंब करत विधिज्ञ बाळासाहेब मोरे यांनी आष्टी वकील संघामध्ये देखील आपले मोठे स्थान निर्माण केले आहे. आ. सुरेश धस यांच्यासोबत काम करत असले तरी त्यांची इतर पक्षातील व सर्व जाती - धर्माच्या युवक कार्यकर्त्यांसोबत मोठे प्रेमाचे संबंध असल्याने आज त्यांचा हा अभिष्टचिंतन सोहळा एवढ्या मोठ्या अगदी एखाद्या लग्न सोहळयासारखा पार पडला आहे. बाळासाहेबांनी माणसे कमवली आहेत, आम्ही देखील बाळासाहेबांचे हे काम पाहून येणाऱ्या पुढच्या काही वर्षात होणाऱ्या निवडणुकीमध्ये बाळासाहेब मोरे यांना निश्चित चांगले स्थान देऊ अशी ग्वाही सागर धस यांनी दिली.

याप्रसंगी विधिज्ञ रत्नदीप निकाळजे, राजेंद्र धोंडे, आष्टी तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष किशोर नाना हंबर्डे, आष्टी तालुका कृषी अधिकारी गोरख तरटे, विधिज्ञ बाळासाहेब शेकडे, बीड जिल्ह्याच्या जिजाऊ ब्रिगेडच्या श्रीम. कमलताई निंबाळकर, आष्टी वकील संघाचे अध्यक्ष विधिज्ञ अजय जेवे, विधिज्ञ ससाणे, खकाळवाडी - शेरीचे सरपंच संदीप खकाळ साहेब, पत्रकार शरद रेडेकर मामा, प्रा. डॉ. नरसाळे आदींनी बाळासाहेब मोरे यांच्या आठवणी व आपल्याला बाळासाहेब मोरे यांच्या माध्यमातून कुठली मदत झाली हे शुभेच्छा पर मनोगतामध्ये सांगितले.

यावेळी युवा नेते शाम भैया धस, गहीनाथ दादा शिरसाट (पाथर्डी), अनिल पाटील (मिरजगाव), बीड एलसीबी चे अशोक दुबाले, सोमनाथ गायकवाड, सरकार ग्रुपचे सचिन आण्णा लोखंडे, कर्जत येथील नितीन भाऊ घुले, आष्टी पोलीस स्टेशनचे प्रवीण क्षीरसागर, धनवडे मामा, नागेश लोमटे, संदीप गिराम तसेच बाळासाहेब मोरे यांची नातेवाईक, आर्यन प्रभात ग्रुपचे सर्व सदस्य तसेच मोठ्या प्रमाणावर मित्रपरिवार उपस्थित होता.

विधिज्ञ बाळासाहेब मोरे यांच्या मित्र परिवाराने आष्टी येथील मूकबधिर शाळेमध्ये, ग्रामीण रुग्णालयामध्ये रुग्णांना फळ वाटप, वृक्षारोपण तसेच प्रशालेमध्ये शैक्षणिक साहित्याचे वाटप अशा विविध सामाजिक उपक्रमाने आपल्या मित्राचा वाढदिवस साजरा केला. आ. सुरेश आण्णा धस, माजी आ. साहेबराव दरेकर, शिक्षण महर्षी भीमरावजी धोंडे यांनी भ्रमणध्वनी वरून बाळासाहेब मोरे यांना शुभेच्छा दिल्या.

## सोनटक्के कुटुंबीयांच्या स्वप्नपूर्ती ला आ.सुरेश आण्णा धस यांच्या शुभेच्छा

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील जामगाव येथील मुळ रहिवासी कुंडलिक पांडुरंग सोनटक्के व छगन पांडुरंग सोनटक्के या दोघा भावांनी अत्यंत खडतर परिस्थितीतून संघर्ष करत जीवनातील यशाचा नवा अध्याय लिहिला आहे. सुमारे २० वर्षांपूर्वी पुणे येथे स्थलांतर करून गवंडी कामासारख्या छोट्या - मोठ्या कामांपासून त्यांनी सुरुवात केली. अथक परिश्रम, प्रामाणिकता व जिद्दीच्या जोरावर बांधकाम व प्लॉटिंग व्यवसायात उल्लेखनीय यश संपादन केले आणि आपल्या कुटुंबाचे स्वप्न सत्यात उतरवले.



या यशस्वी वाटचालीचे परिपूर्ण रूप म्हणजेच पुण्यातील स्वप्नपूर्ती हे त्यांच्या नव्याने उभारलेले व्हिला - टाईप सुसज्ज निवासस्थान. दिनांक १४ ऑगस्ट रोजी या घराचा वास्तुशांती सोहळा जांभुळवाडी, पुणे हिल टॉप येथे मोठ्या उत्साहात पार पडला.

त्या दिवशी उपस्थित राहू न शकल्याने आमदार सुरेश आण्णा धस यांनी दिनांक १७ ऑगस्ट २०२५ रोजी सोनटक्के कुटुंबीयांच्या घरी खास स्नेहभेट दिली. या भेटीदरम्यान त्यां स्वप्नपूर्ती या निवासस्थानाच्या कलात्मक व कल्पक बांधणीचे मनापासून कौतुक केले. ही वास्तू केवळ एक घर नाही तर संघर्षातून फुललेले स्वप्न आणि यशाचा जिवंत नमुना आहे, अशा शब्दांत त्यांनी कुटुंबीयांच्या प्रयत्नांचे गौरवोद्गार काढले.

आमदार सुरेश धस यांनी सोनटक्के कुटुंबीयांच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि त्यांची जिद्द व कार्यतत्परता समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले. यावेळी सोनटक्के कुटुंबातील सर्व सदस्य आनंदी उल्हासाने उपस्थित होते. स्वप्नपूर्ती च्या माध्यमातून त्यांच्या संघर्षाला यशाची मोहोर लाभली असून, या वास्तूचे रूप हे खऱ्या अर्थाने परिश्रम, स्वप्न आणि दृढनिश्चयाची कहाणी सांगते.

## अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करा -उपसभापती श्रीहरी मोरे



हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी

माजलगाव (प्रतिनिधी) तालुक्यात गेल्या ५ ते ६ दिवसापासून झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांच्या मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले आहे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांचे तात्काळ पंचनामे करून शेतकरी बांधवांना हेक्टरी ५० हजार रुपयांची मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

गेल्या ५ ते ६ दिवसापासून माजलगाव तालुक्यात अतिवृष्टी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे सोयाबीन,तूर,कापूस, बाजरी, हे पिके पूर्णतः पाण्यात गेले असून ऊस देखील बऱ्याचठिकानी खाली पडून शेतकरी बांधवांच्या हाता तोंडाशी आलेला घास निघून गेल्याने शेतकरी बांधव हातबल झालेले असून प्रशासनाने अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांचे तात्काळ पंचनामे करून हेक्टरी ५० हजार रुपये मदत द्यावी अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे

## मंठा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सवाचे आयोजन

मंठा (प्रतिनिधी)

आंतरराष्ट्रीय कृष्ण भावनामृत संघ (इस्कॉन) तर्फे मंठा येथे श्रीकृष्ण जन्माष्टमी महोत्सव २०२५ उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. हा महोत्सव रविवार, दिनांक २४ ऑगस्ट रोजी सरस्वती मंगल कार्यालय, मंठा येथे होणार असून विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची रूपरेषा पुढीलप्रमाणे -सकाळी ६ ते ८ वाजेपर्यंत जप सत्र व मंगल आरतीने कार्यक्रमाला प्रारंभ होईल. सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत कीर्तन व अभिषेक, दुपारी १२ ते १२:३० पर्यंत नृत्य, नाटक व श्लोक पठण, त्यानंतर प्रवचन, महाआरती व कीर्तन तसेच दुपारी २ ते ३:३० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.यापूर्वी २३ ऑगस्ट रोजी शनिवारी सायंकाळी ३ ते ७ वाजता नगर संकीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे कथाकार श्रीमान महाभागवत प्रभु असून मार्गदर्शक म्हणून श्रीमान रासगोविंद प्रभु उपस्थित राहणार आहेत.स्थानिक भाविकांना या धार्मिक सोहळ्यात सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.




परभणी,(प्रतिनिधी) : गंगाखेड तालुक्यातील राणीसावरगाव जवळील टाकळवाडी येथील संतप्त ग्रामस्थांनी रस्त्याच्या मागणीकडे लोकप्रतिनिधींसह प्रशासनाने सुरु केलेल्या अक्षम्य दुर्लपणाच्या निषेधार्थ बुधवारी सकाळी तिरडी यात्रा काढली. गावाकडे ये-जा करण्याकरीता रस्ता उपलब्ध नसल्याने वर्षानूवर्षापासून या ग्रामस्थांचे अक्षरशः हाल होत आहेत. परंतु, होणारे हे हाल लोकप्रतिनिधींसह प्रशासनाच्या निदर्शनास येईनासे झाले आहेत. त्यामुळेच टाकळवाडीकरांचा संयम आता सुटला असून १७ ऑगस्ट रोजी संतप्त टाकळवाडीकरांनी रस्त्यावर चिखलात बसून अनोखे आंदोलन केले. पाठोपाठ १८ ऑगस्ट रोजी थाळीनाद केला. त्या पाठोपाठ बुधवार २० ऑगस्ट रोजी सकाळी ७ वाजता या ग्रामस्थांनी टाकळवाडी ते पांगरी फाटा या दीड किलो मीटर अंतरा च्या रस्त्यावर हलकीच्या तालावर तिरडी यात्रा काढली, बोंबाबोंब मारुन प्रशासनाचा निषेध केला व तिरडीचे दहन केले. या संतप्त ग्रामस्थांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह प्रशासकीय अधिकार्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

## स्वामी विवेकानंद महाविद्यालयात 'जनसुरक्षा विधेयक' या विषयावर व्याख्यान संपन्न

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

मुक्रमाबाद येथील स्वामी विवेकानंद महाविद्यालयात राज्यशास्त्र विभाग व सैनिकीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजता 'जनसुरक्षा विधेयक' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विवेक इनामदार हे होते तर कार्यक्रमाचे प्रमुख पाहूने म्हणून डॉ रमाकांत मोहनराव बिडवे,प्रा राजेश चव्हाण हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ रामदास मादळे यांनी केले तर प्रास्ताविक राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ सूर्यकांत सकनूरे यांनी केले. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते प्रा गंगाधर हिंगोले सरांनी 'जनसुरक्षा विधेयकावर' सविस्तर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास डॉ एकनाथ भिंगोले,डॉ शेख जी.जी.,डॉ पांचाळ एन.एच., प्रा रवीकुमार शिवाजीराव ढोकाडे,डॉ काळे जे.पी.,श्री उमाकांत गायकवाड हे उपस्थित होते. या कार्यक्रमास महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारीवर्ग व विद्यार्थी-विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री काशिनाथ (पिंटू) शिंदे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाच्या शेवटी सैनिकीशास्त्र विभागप्रमुख डॉ रविंद्र बाविस्कर यांनी उपस्थितांचे आभार मानले.